**सुविचार**

वेळ चांगली असेल तर इतरांना मदत करा, आणि जर वेळ वाईट असेल तर कष्ट करायची तयारी ठेवा.

गुन्हेगारी-घटनेस वाचा फोडुन झुंज देणारे एकमेव दैनिक

# दैनिक झुंजार जनता

R.N.I. No.MAHMAR/2022/82590 Mo. 8180068180

वर्ष :३ रे | अंक १८६ | रविवार दि.३०/०३/२०२५ | पाने ४ | किमत ४ रु | POSTAL Reg.No.CSN/RNP/537/2024-2026

## इस्लाम धर्म शांती च्या पैगाम द तो डॉ. वाजिद अली खान

### रावेर येथे सामुहिक रोजा इफ्तार

**जळगाव/ हमीद तडवी**

रावेर तालुक्यातील येथील उटखेडा रोडवरील अनिल पाटील यांच्या बगंल्या आवारात जमाते इस्लामी रावेर तर्फे सामुहिक रोजा इफ्तार च्या कार्यक्रमाचा आयोजन करण्यात आला होता . याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करतांना डॉ. वाजिद अली खान म्हणाले की इसलाम धर्मा चे अर्थ आहे शांती पवित्र कूराण हे सर्व मानव जाती साठी आहे आणी प्रत्येक नागरीकानी चांगले कार्य करावे डॉ. खान पुढे




म्हणाले पवित्र कुराणा चे पाँच मुद्दे स्पष्ट केले निर्मती ' मानव जाती ची निर्मिती ' जिवना चा उद्देश , जिवनाचामार्ग , सर्वाची परिक्षा ' यावर रुखोल चर्चा केली जमाते इसलामी ने भारत देशात पवित्र कुराणाचे १५ भाषेत भाषेनंतर केले आहे.सदर कार्यक्रमास माजी आमदार शिरिष दादा चौधरी , माजी नगराध्यक्ष हरिष गनवाणी' डॉ. सुरेश पाटील , डॉ. मिलिंद वानखेडे , डॉ. योगोश महाजन , डॉ. किशोर महाजन , डॉ राजेंद्र पाटील, दिलीप कांबळे, विशाल अग्रवाल , नितीन पाटील , नामदेव महाजन, शेख सादिक मेंबर ,शेख ग्यास, डॉ. वसीम ,डॉ. हनिफ ,इकबाल काझी, सरफराज खान , शेख रईस , अय्युब खान , शेख सउद , हनिफ जनाब , मंजूर टेलर, सैय्यद अय्युब , कार्यक्रमास मोठ्या संख्याने हिन्दू मुसलीम बाधंव उपस्थित होते .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार एस.के . शेख यांनी केले .

## तनपुरेंचा पोलिसांना इशारा ; आरोपींना अटक करा अन्यथा

# 'राहुरी' बेमुदत बंद ?

राहुरीः छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची विटंबना होऊन तीन दिवस उलटले तरी आरोपींना अद्याप अटक झालेली नाही. १ एप्रिल २०२५ पर्यंत आरोपींना अटक न केल्यास संपूर्ण राहुरी तालुका बेमुदत बंद ठेवण्यात येईल, असा इशारा माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी दिला आहे. प्राजक्त तनपुरे यांनी काल त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात ऑनलाईन पत्रकार परिषद घेतली. २६ मार्च रोजी राहुरीतील बुवाशिंद्ध बाबा तालिमेतील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची काही अज्ञात व्यक्तींनी विटंबना केली. त्यानंतर मोठे आंदोलन झाले. पोलिसांनी दोन दिवसांत आरोपींना शोधून गुन्हा दाखल करू, असे आश्वासन दिले. गुरुवारी राहुरी शहर बंद ठेवण्यात आले होते. दुसऱ्या दिवशी पुन्हा बंद पुकारण्यात येणार होता. मात्र, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष प्रकाश पारख यांनी पोलिसांनी मागितलेली दोन दिवसांची मुदत दिली जावी, त्यानंतर आम्ही बंदमध्ये सहभागी होऊ, असे सांगितल्याने बंद मागे घेण्यात आला. त्यानंतर तीन दिवस उलटूनही पोलिसांनी कोणत्याही संशयिताला अटक केलेली नाही, हे गंभीर असल्याचे तनपुरे यांनी स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले की, "सरकारला आणि पोलिसांना याबाबत गांभीर्य नसेल, तर आम्ही स्वस्थ बसणार नाही. राज्यात सातत्याने छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान केला जात आहे. या सरकारच्या काळात शिवाजी महाराजांचा पुतळा सहा महिन्यांत कोसळतो. राहुल सोलापूरकर अपशब्द वापरतात.

## विहामाडव्यात काळ्या पट्या बांधून वक्फ (दुरुस्ती) विधेयकाला निषेध

विहामांडवा प्रतिनिधी, अनिस शेख

वक्फ (दुरुस्ती) विधेयक 2024 विरोधात देशभरात निदर्शने होत आहेत. ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड (AIMPLB) ने मुस्लिमांना रमजानच्या शेवटच्या शुक्रवारी काळ्या पट्ट्या लावून या विधेयकाचा शांततेने निषेध करण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत पैठण तालुक्यातील विहामांडवा येथे शुक्रवारी मुस्लिम बांधवांनी काळ्या पट्ट्या बांधून शांततापूर्ण निषेध व्यक्त केला.

यावेळी माजी सरपंच राजुभाई शेख यांनी निषेध व्यक्त करतांना सांगितले की,नवीन विधेयकामुळे वक्फ बोर्डाची सत्ता कमी होईल आणि मुस्लिम समाजाच्या धार्मिक आणि सामाजिक ठिकाणांवर सरकारी हस्तक्षेप वाढेल.हे विधेयक मुस्लिमांना त्यांच्या मशिदी, इदगाह, मदरसे, दर्गा, खानखा आणि दफनभूमीपासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न आहे. देशातील प्रत्येक मुस्लिमाने या विधेयकाला कडाडून विरोध करण्याचे आवाहन मंडळाने केले आहे.

यावेळी माजी सरपंच राजुभाई शेख,मरकज मस्जीदचे इमाम मौलाना रईस,कलिंदर शेख,इसाक शेख,अजिज पटेल, चेअरमन असलम शेख,अश्फाक अत्तार,बिलाल शेख,पत्रकार इम्तीयाज शेख,जावेद शेख,शिराज शेख ,वायमेन फिरोज शेख,रफिक टेलर,जावेद पटेल,अल्ताफ पठाण,आसेफ पठाण,अकबर सय्यद,साजेद तांबोळी,सलमान शेख,जावेद तांबोळी,तसेच तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# अविरत सेवा आणि सृजनशीलतेचा प्रवास

## अप्पर पोलिस अधिक्षक मा. अन्नपूर्णा सिंह मॅडम यांची कौतुकाची थाप

पैठण प्रतिनिधी

समाजकार्य, साहित्य, शिक्षण आणि राजकीय योगदान– या सर्व क्षेत्रांमध्ये काम करत असताना सशक्त मन आणि त्याग याने आपसुक वेगळी ओळख निर्माण होते. लोकमत सखी मंचाच्या रौप्य महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने आपल्या प्रवासाची उजळणी करताना हा प्रवास केवळ एका व्यक्तीचा नव्हे, तर एका ध्येयवेड्या मनाचा आहे, जो समाजप्रेम, कर्तव्यभाव आणि साहित्याच्या ओढीने आसुसलेलात आहे.

सर्वसामान्य स्त्रीच्या सशक्तीकरणासाठी स्व. ज्योत्स्ना दर्डा यांनी रोवलेले बीज आज एक वटवृक्ष बनले आहे. लोकमत सखी मंच, महिलांच्या सन्मानाचा व जागृतीचे एक महत्वपूर्ण व्यासपीठ बनवले आहे. पैठण येथे स्त्रियांच्या प्रति आदरभाव असणारे स्व. संजयभाऊ जाधव यांच्या प्रयत्नांतून 13 मार्च 2016 रोजी आमच्या निवासस्थानी लोकमत सखी मंच ची मिटिंग झाली आणि या मंचाचा शुभारंभ पैठण येथे झाला. आणि आज १० वर्षांच्या यशस्वी प्रवासानंतर हा मंच अधिक बळकट झाला आहे. या मंचाची मी साक्षीदार आहे याचा मला अभिमान आहे. आताचे तालुका प्रतिनिधी गलांडे सर यांच्या देखील सुंदर अशा नियोजनाने महिलांच्या सन्मानाचा कार्यक्रम आयोजित केला.

या प्रवासात अनेक अडचणी आल्या, परंतु यश मिळवण्याची जिद्द आणि कार्य करण्याची तळमळ यामुळे सर्व अडथळे पार करत यशाच्या दिशेने वाटचाल सुरूच राहिली. महिला समुपदेशन केंद्राच्या माध्यमातून अनेक कुटुंबांना स्थैर्य मिळाले, अनेक संसार पुन्हा उभे राहिले. २००६ पासून निःस्वार्थ सामाजिक कार्य करताना बालकल्याण समिती सदस्य म्हणून ५ वर्षांच्या कार्यकाळात २४७ विद्यार्थ्यांना बाल संगोपन योजनेचा लाभ मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली. बालकल्याण सदस्य म्हणून आम्ही काम करत असताना जालना ( अतिरिक्त चार्ज)आणि छ. संभाजीनगर दोन्ही जिल्ह्याचे काम बघत असताना 2 वर्ष कोरोना काळात दररोज पैठण ते संभाजीनगर व पैठण ते जालना या प्रवासात फिरत असताना कोरोना जवळ ही फिरकला नाही. 21 दिवसाच्या लॉक डाउन मध्ये पैठण संभाजीनगर प्रवास अनुभवला रस्त्यांनी जाताना स्मशान शांतता ट्रॅफिक नाही काही नाही . अती दक्षता विभाग 0 ते 18 वयोगटातील काम असल्यामुळे असल्याने आम्हाला एकही दिवस सुट्टी घेता येत नव्हती .शैक्षणिक क्षेत्रातही १६ वर्षे अविरत कार्य करताना अनेक उपक्रम राबवले, विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सतत कार्यरत राहिले.

महिला सुरक्षा आणि सशक्तीकरणासाठी सतत कार्यरत आहे. आज आणि उद्या कार्य हे चालुच राहणार आहे.

समाजाप्रती असलेला नितांत आदरभाव आणि महिलांच्या सुरक्षेसाठी झपाटलेपणाने काम करण्याची उमेद असल्यामुळे गेल्या १८ वर्षांपासून (२००८ पासून) महिला दक्षता समिती सदस्य म्हणून पैठण पोलिस स्टेशनमध्ये आणि जिल्हा दक्षता समिती सदस्य म्हणून कार्यरत




आहे. पोलिस निरीक्षक देशमुख सरांच्या मार्गदर्शनाखाली महिलांसाठी व विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबवले. महिलांच्या सुरक्षेविषयी जनजागृती करणारे उपक्रम, सायबर गुन्हे आणि आत्मरक्षण यासंबंधी कार्यशाळा, तसेच विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करत समाजातील प्रत्येक घटकाला मदत करण्याचा प्रामाणिक प्रयत्न सुरू आहे.

राजकीय क्षेत्रातील २० वर्षांचा अनुभव देखील खुप काही शिकवून देणारा आहे.

२००६ पासून शहराध्यक्ष ते प्रदेश प्रकोष्ठ संस्थाचालक आणि सहसंयोजक म्हणून सातत्याने कार्यरत राहिल्याचा प्रवास राजकीय क्षेत्रातील समर्पण अधोरेखित करतो. राजकारण म्हणजे केवळ सत्ता नव्हे, तर समाजसेवेचे प्रभावी माध्यम आहे, हे सतत कृतीतून सिद्ध करण्याचा प्रयत्न राहिला.

साहित्याचा अखंड प्रवासात आवड आणि सवड जोपासत गेले. खुप काही नाही पण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न आनंद देत गेला. लिखाण हे कोणासाठी नाही तर स्वतःच्या मनाला शांत करण्याचे प्रभावी माध्यम आहे. असे माझे स्वमत आहे.

लहानपणापासून वाचन, लिखाण आणि कवितेची आवड असल्यामुळे साहित्य संमेलनात सहभाग, स्वरचित कवितांचे सादरीकरण हा जिव्हाळ्याचा विषय बनला. वडिलांची साहित्यप्रेमाची परंपरा पुढे चालवताना, विविध विषयांवर लेखन वाचनाच्या माध्यमातून विचारांची देवाण-घेवाण सुरू आहे. सन्मान आणि प्रेरणा हे एका स्त्रीला आवश्यक असते कारण ती परत सृजनशीलतेचा प्रवास चालु ठेवते.आणि काम करण्याचा हुरुपही येतो.

समाजासाठी केलेल्या कार्याची दखल घेत माननीय अप्पर पोलिस अधिक्षक अन्नपूर्णा सिंह (छ. संभाजीनगर) यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा केवळ सन्मान नव्हे, तर कार्य करण्याची अधिक ऊर्जा मिळवून देणारी प्रेरणा आहे. गगनाला उंच भरारी मारणाऱ्या स्त्रीने सर्वसामान्य स्त्रीच्या पाठीवर कौतुकाची शाबासकी देणे यातच स्त्रीचा खरा आत्मानंद आहे. असे मला वाटते. संपूर्ण प्रवासाकडे पाहिल्यास हा प्रवास वैयक्तिक नसुन संपूर्ण

कुटुंबाच्या पाठिंब्याने सुरु आहे समाजऋण फेडण्याचे बाळकडू आजोबा स्वातंत्र्यसैनिक असल्यामुळे आणि मुख्याध्यापक असणाऱ्या बाबांचा प्रत्येक क्षेत्रातला सहभाग. बरेच काही शिकवुन जातो. आणि कुटुंबा , मुले , पतीचा पाठिंबा आणि आणि संत एकनाथ महाजाच्या आशीर्वादामुळे मिळाले आहे ससर्वांची मी सदोदित कृतज्ञ राहिल.

सन्मान हा व्यक्तीचा नसतो, तर त्याच्या मागे उभ्या असलेल्या कुटुंबाचा, सहकाऱ्यांचा आणि समाजाचा असतो.

अशा या प्रवासाचा उत्सव साजरा करताना एकच प्रार्थना– जो पर्यंत ताकद आहे, तोपर्यंत समाजाप्रती असलेले ऋण फेडण्याची शक्ती लाभो हीच नाथचरणी प्रार्थना .

## राजाराम शिरडकर यांचे निधन



तळणी :- ( पंजाबराव सुर्यवंशी ) हदगाव तालुक्यातील शिरड येथील राजाराम दिनाजी शिरडकर यांचे अल्पशा आजाराने २९ मार्च शनिवार रोजी सकाळी निधन झाले . मृत्यू समयी ते ७ ५ वयाचे होते . त्यांच्या पश्चात तीन मुलं , सूना , नातवंडे असा परिवार आहे .

## समाजातील मूल्यांची जाणीव करणारी काँग्रेसची मोहीम : गुढीपाडवा आणि ईद साजरे करण्याचे आवाहन"

सोयगाव तालुका...

प्रतिनिधी दिलीप मोरे...

सोयगाव तालुक्यात या वर्षीच्या गुढीपाडवा आणि ईदच्या आनंदोत्सवातून शांतता आणि समृद्धी कायम राहिल याकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले आहे. काँग्रेसचे तालुका उपाध्यक्ष दिलीप देशमुख यांनी हिंदू आणि मुस्लिम बांधवांना या सणांना शांततेने साजरे करण्याचे आवाहन केले. त्यांनी हे आवाहन करताना, "आपल्या तालुक्यातील विविधतेतून एकता जोपासण्याचा प्रयत्न करू. हिंदू मुस्लिम बांधवांनी एकमेकांच्या सणांबद्दल प्रेम आणि आदर बाळगावा," असे म्हटले.

गुढीपाडवा आणि ईद या सणांच्या निमित्ताने होणाऱ्या शांततापूर्ण वातावरणाचा परिणाम सोयगाव तालुक्यातील सामाजिक एकात्मतेत दिसून येतो. या सणांच्या काळात समाजातील सर्व स्तरातील लोक एकत्र येतात, ज्यामुळे आपापसातील संवाद आणि आदराची भावना वाढते. हे आपल्या समाजातील मूल्यांची जाणीव करून देते.

हा प्रकारचा समन्वय आणि एकजूट केवळ सणांपुरता मर्यादित न राहतो, तर तो पूर्ण वर्षभर असलेल्या तणावपूर्ण परिस्थितीत स्थिरता आणि सामंजस्य निर्माण करण्याचे काम करतो. अशा प्रकारे हे एक महत्त्वपूर्ण धार्मिक आणि सामाजिक मूल्य बनते जे आपल्या सामाजिक संरचनेचा भक्कम पाया घालण्यास मदतील आहे.

गुढीपाडवा आणि ईदच्या सणांच्या शांततापूर्ण साजरीकरणामुळे सोयगाव तालुक्यातील नागरिकांमध्ये सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यविषयक जाणीव वाढते. हे प्रयत्न समाजातील सह correcting कार्याचा भाग बनतात, ज्यामुळे तेथील लोकांच्या मनात इतर धर्म आणि संस्कृतींबद्दल आदर आणि सहिष्णूता वाढते. या प्रकारची एकता प्रसारित करण्याचा प्रयत्न हा केवळ सामाजिक सौहार्द वाढवणारा नसून, तो भविष्यातील सामाजिक स्थिरता आणि प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण आहे.



काँग्रेस तालुका उपाध्यक्ष दिलीप देशमुख यांनी समाजातील विविधतेतून एकता जोपासण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले, "आमच्या तालुक्यातील हिंदू मुस्लिम बांधवांनी एकमेकांच्या सणांचा आदर बाळगावा आणि ते शांततेने साजरे करावेत. हे आपल्या समाजाच्या स्थित्यंतराचे प्रतीक असेल."

## सरपंच संघटने कडून हरिभाऊ डोलारे यांचा सत्कार



जिल्हा प्रतिनिधी धाराशिव

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखाना लिमिटेड केशेगाव ता.जी. धाराशिवच्या संचालकपदी हरिभाऊ भाऊराव डोलारे यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार सरपंच संघटना यांच्याकडून करण्यात आला यावेळी उपस्थित कसबे तडवळेचे सरपंच विशाल जमाले जहागीरदारवाडी उपसरपंच अविनाश चव्हाण खामगावचे सरपंच अमर शिंनगारे तसेच शिवसेना नेते संतोष डोलारे सर व भारत अप्पा डोलारे माजी जिल्हा परिषद सदस्य धाराशिव हे उपस्थित होते

## शिव महापुराण कथेची महाप्रसादाने उत्साहात सांगता

तळणी :- हदगाव तालुक्यातील उंचेगाव ( बु . ) येथे श्री महादगीर महाराज २२ मार्च पासून संत तुकाराम महाराज गाथा पारायण आणि शिव महापुराण कथा सप्ताह ला सुरुवात झाली होती , सप्ताह दरम्यान काकडा , हरीपाठ , कथा , किर्तन , भजन अदी धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले .

२९ मार्च रोजी ह भ प पांडूरंग महराज संगमेकर यांचे काल्याचे किर्तन झाल्या नंतर महाप्रसाद घेऊन सप्ताहा ची सांगता करण्यात आली .

सप्ताहा ची सांगता निमीत्त गावातून पालखी मिरवणूक काढण्यात आली होती . डोक्यावर कलश व गाथा घेऊन पालखी ने संपूर्ण गावातून प्रदक्षीणा घातली . गावातून पालखी फिरतांना जागोजार्गी पालखी चे पुजन करण्यात आले . माजी आमदार माधवराव पाटिल , व पिंपळगाव येथील महंत बाल योगी यांनी भेट दिली. तसेच माजी खासदार सुभाषरावजी वानखेडे व खासदार नागेश पाटिल असटिकर यांचे सुपुत्र कृष्णा पाटिल हे हि उपस्थित होते.

परिसरातील भावीक भक्तांनी व ग्रामस्थांनी महाप्रसादाचा लाभ घेतला . सप्ताह यशस्वीरीत्या पार पाडण्या करीता समस्त गावकरी मंडळींनी परीश्रम घेतले .





दैनिक झुंजार जनता

२
रविवार दि.३०/०३/२०२५

# लोकशाही पत्रकार संघाच्या प्रदेश उपाध्यक्ष पदी शुभांगी पाटील

अनिस कुरैशी.....
पाचोड/ लोकशाही पत्रकार महाराष्ट्रराज्य उद्योग विकास समितीच्या प्रदेश उपाध्यक्ष पदी निवड श्रद्धा कंडूडे प्रदेश अध्यक्ष,संध्या सरोदे प्रदेश कार्याध्यक्ष उद्योग विकास समिती, पांडुरंग साळुंके पुणे जिल्हा अध्यक्ष यांनी
संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, प्रदेश अध्यक्ष प्रताप साळुंके, प्रदेश सचिव गणेश जगदाळे, प्रदेश कार्याध्यक्ष अयुब पठाण, आयेशाखान मुलानी, निलोफर शेख प्रदेश अध्यक्ष उत्तर महाराष्ट्र, प्रदेश उपाध्यक्ष वसीम आजाद, साजेद सय्यद, अनिस कुरेशी यांच्या आदेशानुसार केली. या यावेळी संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य म्हणाले की, पाटील ह्या ब्युटी पार्लर, टेलरिंग क्षेत्रात कलासेस च्या माध्यमातून महिला आपल्या पायावर उभा करीत आहेत. गारमेंट क्षेत्रातील मोठं क्लस्टर उभा करून अनेक महिलांना रोजगार निर्मिती करणार आहे. या त्यांच्या कार्याची दखल घेऊन निवड केली आहे. तसेंच लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य पत्रकारांच्याआणि महाराष्ट्र मधील तमाम सर्व सामान्य नागरिकांचे देखील विविध मागण्या शासन दरबारी मांडून मंजूर करून घेणार आहेत. विविध समित्या स्थापन करून महाराष्ट्र राज्यात तालुक्यात सर्वत्र विकास केला जाईल. विविध कार्यक्रम साजरे केले जातील. एक वेगळा ठसा उमटवण्याचा लोकशाही पत्रकार संघाच्या माध्यमातून प्रयत्न केला जाईल.



नवनिर्वाचित पदाधिकारी शुभांगी पाटील म्हणाल्या की, पुणे शहर सह संपूर्ण महाराष्ट्र मध्ये उद्योग क्षेत्रात मोठी क्रांती उद्योग उभारून करू. महिलांना विविध उद्योगाच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक सक्षम करू. मला खात्री आहे की, शासन सर्व तो परी सहकार्य करील. असेही निवडी प्रसंगी त्या म्हणाल्या होत्या. शब्द सुमानाने पाटील यांचा सत्कार करून संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, राष्ट्रीय अध्यक्ष माणिक वाघमारे, राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप जाधव, राष्ट्रीय कार्याध्यक्ष मंगला वाघ, राष्ट्रीय निरीक्षक डॉ. भोळे, मुंबई प्रदेश अध्यक्ष मंत्रालय कामकाज दत्तात्रय हंडीबाग, राष्ट्रीय सचिव छाया वैद्य, राष्ट्रीय अध्यक्ष महिला बचत गट, उद्योग विकास समिती सुनंदा केदार, मराठवाडा उपाध्यक्ष दत्ता भाऊ नरनाळे यांच्या मार्गदर्शनानुसार लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य , संध्या सरोदे प्रदेश कार्याध्यक्ष उद्योग विकास समिती मनमोहन तोमर नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष,शिवराज बिराजदार सोलापूर शहर उपाध्यक्ष,नवी मुंबई सरचिटणीस बालाजी सूर्यवंशी, लक्ष्मण भोसले - सोलापूर शहर सचिव,
जस्मित तोमर - नवी मुंबई महिला आघाडी, प्रदेश उपाध्यक्ष संध्या भोसले, प्रदेश उपाध्यक्ष महिला बचत गट उद्योग विकास समिती सारिका शेवाळे, प्रदेश अध्यक्ष महिला अन्याय अत्याचार निर्मूलन विकास समिती श्रद्धा कंडूडे, मराठवाडा युवक अध्यक्ष दिपक भाऊ थोरात,प्रदेश उपाध्यक्ष पोलीस मित्र विकास समिती राणी झिंझुर्डे पाटील, प्रदेश सचिव राणीताई शेख, बीड जिल्हा अध्यक्ष शेख बिलाल, आत्माराम वाव्हाळ यांनी पुढील कार्यास मनःपूर्वक खूप खूप शुभेच्छा दिल्या आहेत.

# यावल तालुका व शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ( शरदचंद्र पवार ) पक्षाची आढावा बैठक निरीक्षक काळे यांच्या उपस्थितीत संपन्न.

यावल दि.२९ ( सुरेश पाटील )
यावल तालुका व शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ( शरदचंद्र पवार ) पक्षाची आढावा बैठक निरीक्षक भास्करराव काळे,जिल्हाध्यक्ष प्रमोद पाटील यांच्या उपस्थितीत संपन्न झाली संघटन वाढीसाठी महत्वाची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी बैठकीस मार्गदर्शन करताना जिल्हाध्यक्ष प्रमोद पाटील यांनी शेतकऱ्यांना निवडणुकीच्या काळात युती सरकारने दिलेल्या आश्वासना नुसार सरसकट कर्ज माफ करावे.या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा भरात आंदोलन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. आगामी काळामध्ये होणाऱ्या जिल्हा परिषद,पंचायत समिती तसेच नगरपालिका निवडणूक साठी कार्यकर्त्यांनी सज्य राहावे यासंबंधी मार्गदर्शन करण्यात आले. या बैठकीस पक्षाचे जळगाव जिल्हा निरीक्षक भास्करराव काळे, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष



अशोक पाटील जिल्हा सरचिटनिस विजय पाटील आदिवासी सेल चे एम.बी तडवी,यावल तालुका अध्यक्ष प्रा. मुकेश येवले यांनी मार्गदर्शन केले. बैठकीत राष्ट्रवादी युवक तालुका अध्यक्ष पवन पाटील,फैजपूर शहराध्यक्ष अनवर खाटीक,तालुका उपाध्यक्ष ललित पाटील,माजी उपनरगरध्यक्ष अकबर खाटीक, नानाजी पाटील,यावल शहर अध्यक्ष अन्सार खान,सईद भाई, मोहराळा विका चेअरमन किरण पाटील, युवक ता सरचिटणीस मयूर पाटील सामा न्याय ता. अध्यक्ष अरुण लोखंडे शहराध्यक्ष कामराज घारू,बापू जासूद,पितांबर महाजन,सहदेव पाटील,मोहसीन खान,हाजी युसूफ शेठ,ललित पाटील,भैया पाटील,आबीद कच्ची,सद्दाम शेख,भगवान बरडे,ललित तेली,सहदेव पाटील,राहुल गजरे,गिरीश पाटील,तुषार येवले संतोष तायडे,विनोद पाटील,किशोर तायडे कासवे,याकुब तडवी,शरीफ तडवी,जुनेद खान,मण्यार मिस्तरी उपस्तित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.मुकेश येवले तर आभार प्रदर्शन पवन पाटील यांनी केले.

# वैजापूर मध्ये पुन्हा एकदा बिबट्याचा अहहकार... तीन वर्षीय मुलगी बनली बिबट्याची शिकार...

वैजापूर प्रतिनिधी अर्जुन शिंदे.
वैजापूर तालुक्यात अनेक ठिकाणी बिबट्याचा अहहकार चालू आहे.
ऋतुजा सचिन कर्डक (रा. तांदुळवाडी ता. गंगापूर) ही मुलगी मामाच्या गावाला (वळण ता. वैजापूर) इथे मामाच्या गावी आली होती.
वैजापूर तालुक्यात वळण शिवारामध्ये बिबट्याच्या हल्ल्यात तीन वर्षीय मुलगी ठार

वैजापूर तालुक्यातील वळण शिवारामध्ये गट क्रमांक ७७ मध्ये संध्याकाळी सहाच्या सुमारास ऋतुजा सचिन कर्डक (रा. तांदुळवाडी ता. गंगापूर) या तीन वर्षीय मुलीवर अचानक बिबट्याने



हल्ला केला. या हल्ल्यामध्ये मुलगी जखमी होऊन तिला वैजापूर उपजिल्हा रुग्णालय येथे तिला मृत घोषित केले.

याच परिसरात एक महिन्यापूर्वी एका दहा वर्षीय मुलाला बिबट्याने हल्ला केल्याने मुलगाही ठार झाला होता. यामुळे

वळण व परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतामध्ये कापूस वेचणी, ज्वारी सोंगणी, कांदा काढणी हे काम चालू असताना महिलांना संरक्षण म्हणून पुरुषांना त्यांच्या बरोबर शेतामध्ये जावे लागते. ग्रामस्थांची वनविभाग अधिकाऱ्याला वारंवार सूचना देऊनही ते दुर्लक्ष करत आहे. अजून कित्येक मुलांचा जीव गेल्यानंतर प्रशासन झोपेतून जागे होईल असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.



पिएमश्री प्रशाला माहोरा शैक्षणिक सहल पिएम श्री जि प प्रशाला माहोरा येथील 09 बस वेरूळ, दौलताबाद किल्ला, संभाजी नगर येथे आज सकाळी मान्यवरांच्या उपस्थितीत रवाना.

# सक्षम कुटुंब व्यवस्था निर्माण होणे गरजेचे: न्या. अंजु शेंड

**पाथर्डी**:-समाजातील जे दुर्लभ घटक आहे त्यांच्या पर्यंत शासनाच्या सर्व योजना पोहचवण्याचे काम जिल्हा विधी सेवा प्राधिकरण करत असून सक्षम समाज निर्माण होण्यासाठी अगोदर सक्षम कुटुंब व्यवस्था निर्माण होणे गरजेचे असल्याचे मत अहिल्यानगरच्या प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजु शेंडे यांनी केले. अहमदनगर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,पाथर्डी तालुका विधी सेवा समिती,व तालुका वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयक व शासकीय योजनांचे शिबीर जनजागृती शिबीर पाथर्डी शहरातील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात आयोजित करण्यात आले होते.या शिबिराच्या उदघाटन प्रसंगी शेंडे बोलत होत्या.यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव बी. के. पाटील,उपविभागीय अधिकारी प्रसाद मते,पाथर्डी न्यायालयाचे दिवाणी न्यायाधीश श्री.एम. ई.पवार,आर.व्ही. सपाटे,एस.डी.वाघमारे,तहसिलदार डॉ. उध्दव नाईक,पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे, पालिकेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे,वनपरिक्षेत्र अधिकारी अरुण साबळे,कवी कैलास दौंड,पाथर्डी वकिल संघाचे अध्यक्ष राणा खेडकर,उपाध्यक्ष व्ही.बी.बडे,सचिव पी.एम.भाबड,वकील अमोल पालवे,अँड.हरिहर गर्जे,व्ही डी वेलदे,नितीन वायभासे हे उपस्थित होते.शिबिरात तालुक्यातील सर्वच शासकीय खात्यांचे स्टोल उभारण्यात येऊन शासनाच्या सर्व योजनांची माहिती नागरिकांना देण्यात येऊन बचत गट,शासनाच्या विविध योजनांच्या लाभार्थ्यांना यावेळी लाभ देण्यात आला.यावेळी बोलताना शेंडे म्हणाल्या की,ज्यांच्या पर्यंत न्यायव्यवस्था व शासनाच्या योजना पोहचू शकत नाही त्यांच्या पर्यंत या योजना पोहचवण्याचा कायदा १९८५ मध्ये अस्तित्वात आला.शासनाने सर्वांना समानता दिली आहे.समानता नसेल तर तो काहींवर अन्याय ठरेल.दिवसेंदिवस माणूस प्रगत जरी होत गेला तरीही काही घटक मात्र वंचित सुद्धा राहिले आहे.या वंचितांना न्याय देण्याची जबाबदारी ही सर्वांची आहे. आज सर्वच गोष्टींसाठी शासन यंत्रणा काम करत आहे.एखाद्याची जमीन दुसरा कसू शकत नाही कारण शासकीय यंत्रणा आहे.शासन आपल्या दारी ही योजना त्यासाठीच आणण्यात आली आहे.कायद्याने आपल्याला किती



सबळ केले आहे याची जाणीव अनेक महिलांना झालेली नाही. लग्न जमतात व तुटतात मात्र त्यावेळी बालकांना काय हवे याचा गांभीर्याने विचार केला जात नाही. सक्षम समाज निर्मिती करताना कुटुंब व्यवस्था आधी सक्षम करणे गरजेचे आहे व त्या साठी बुद्धिवंतांनी आपले योगदान देणे महत्वाचे असल्याचे शेवटी त्या म्हणाल्या.प्रास्ताविक राणा खेडकर तर सूत्रसंचालन राजु सुरुवसे यांनी करून आभार अमोल पालवे यांनी मानले.

# डोंगर-दऱ्यात भटकंती करीत पर्यटकांनी लुटला आनंद

**अहिल्यानगर** - नगरकरांमध्ये पर्यटनाची संस्कृती रूजविणार्या ट्रेककॅम्प संस्थेचा वर्धापनदिन इमामपूर येथील खिरणीचा महादेव ट्रेकमध्ये उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी नागरिकांनी निसर्गाशी एकरूप होत पर्यटनाचा आनंद लुटला.नागरिकांना पर्यटनाची आवड निर्माण व्हावी यासाठी १३ वर्षांपूर्वी विशाल लाहोटी यांनी ट्रेककॅम्प या संस्थेची स्थापना केली. मात्र, ुरुवातीला पर्यटनाबाबत फारशी उत्सुकता नसल्याने ट्रेकला अल्प प्रतिसाद मिळत असत. त्यानंतर लाहोटी यांनी ट्रेकॅम्पच्या माध्यमातून 'साद गर्भगिरीला' हा उपक्रम सुरू केला. त्यास मात्र अबालवृद्धांचा भरभरून प्रतिसाद मिळत आहे. वर्धापनदिनानिमित्त रविवारी भल्या पहाटे निसग्रप्रेमी छत्रपती संभाजीनगर रस्त्यावरील हॉटेल महाराजाजवळ जमले. तेथे सर्वांना सूचना देण्यात आल्या. त्यानंतर सर्वजण दुचाकी, चारचाकीवर नगर तालुक्यातील इमामपूर गावातून डोंगराच्या कुशीत वसलेल्या खिरणीच्या महादेव मंदिराजवळ पोहोचले. तेथे सर्वांनी एकत्रितपणे व्यायाम केला. नंतर स्वयंसेवकांच्या मार्गदर्शनाखाली डोंगरात भटकंती करण्याचा आनंद लुटला. डोंगरांत असणारी विविध वनस्पती, फुले आदींबरोबरच नागरिकांनी सेल्फीचा आनंद घेत मनमुराद फोटो काढले.

# तरूणांनी व्यसनापासून दूर रहावे : माऊली महाराज वाबळे

**लोणी धामणी** : ज्या पद्धतीने मंदिराला कळस हा महत्त्वाचा असतो त्याच पद्धतीने संसारात ही कळसाची भूमिका या महिला पार पाडत असतात स्त्री ही पुरुषांच्या तुलनेत कुठेही मागे नाही. काकणभर सरस आहे.समाजात आदर्श पिढी निर्माण करण्याचे काम महिलांच्या हातून होत असतं. तरुणांनी व्यसनांपासून दूर राहून समाजातील जबाबदार नागरिक म्हणून वागले पाहिजे. असे मत ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाबळे यांनी व्यक्त केले. काठापूर बुद्रुक (तालुका आंबेगाव) येथील गणेशनगर मध्ये पिरसाहेब मंदिराच्या कलशारोहन निमित्त ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाबळे यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी वाबळे महाराज बोलत होते. यावेळी बोलताना महाराज म्हणाले की पर्यावरणाचा सध्या समतोल ढासळत असून वृक्षांची भूमिका महत्त्वाची असून वृक्षांचे संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. संतांनीही हेच प्रबोधन आपल्या वेगवेगळ्या अभंगातून केले असून.मंदिराच्या परिसरात असलेली वृक्षांची संख्या आणि नैसर्गिक सौंदर्य हे आनंददायी असून. मंदिर हे समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याचे काम करते. समाजाने एकत्र येऊन प्रगती




केली पाहिजे असे वाबळे महाराज म्हणाले. यावेळी भीमाशंकर कारखान्याचे संचालक बाळासाहेब घुले, रामचंद्र ढोबळे, सरपंच अशोक करंडे,माजी उपसरपंच विशाल करंडे, पारगावच्या सरपंच श्वेता ढोबळी.यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.काठापूर बुद्रुक येथील गणेश नगर ग्रामस्थांनी निसर्गाच्या सानिध्यात असणाऱ्या पिरसाहेब मंदिराचा जिर्णोद्धार केला आहे. या कार्यक्रमाची व्यवस्था कमिटीचे अध्यक्ष निवृत्ती करंडे, उपाध्यक्ष सुभाष जाधव, खजिनदार विठ्ठल करंडे, बाळासाहेब करंडे,संतोष करंडे, नवनाथ जाधव,रामदास करंडे, नवनाथ करंडे,सोमनाथ जाधव, अनिल करंडे,अनिल जाधव,सुदर्शन करंडे,ज्ञानेश्वर जाधव,रविंद्र करंडे,हनुमंत जाधव,अक्षय करंडे यांचं

# रयत माउली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील पुण्यतिथी व छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिन संपन्न

**कवठे येमाई** :- कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील त्यांच्या पत्नी रयत माऊली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांची पुण्यतिथी व छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिन कार्यक्रम आज शनिवार दि. २९ ला शिरूर तालुक्यातील कवठे येमाई येथील रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इन्गिश स्कुल व जुनिअर कॉलेज मध्ये संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नूतन प्राचार्य जगदीश टिकले हे होते. कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या सामाजिक कार्यात त्यांच्या पत्नी रयत माऊली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांचेही योगदान अत्यंत मोलाचे आहे.लक्ष्मीबाईनी रयत शिक्षण संस्थेच्या जडणघडणीत तन,मन,धन अर्पण केले. म्हणून त्यांच्या पद परिसस्पर्शाने रयत शिक्षण संस्थेचे सोने झाले. इ.स.१९३० साली लक्ष्मीबाईचे निधन झाले. पण त्यांनी मरणोत्तर आपली व्यक्त केलेली इच्छा म्हणजे बोर्डींगमध्ये सर्व जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश असावा व दुर्सय़ा दिवशी पाडव्याचे जेवण सर्वांनी घ्यावे. या त्यांच्या विचारावरून त्यांच्यातील दूरदृष्टी व समाजहिताची सदोदीत घेतलेली काळजी याची ग्वाही पटते. लक्ष्मीबाईंचा आदर्श व कृती ही भारतीय स्त्रियांना आजही प्रेरणा देणारी घटना आहे. त्याची आठवण म्हणून पुढे सौ. लक्ष्मीबाई पाटील मेमोरिअल एज्युकेशन फंड हा उपक्रम सुरु करण्यात आला.आज या फंडातून गरीब होतकरु आणि गरजू हजारो विद्यार्था याचा फायदा आज घेत आहेत.आजच छत्रपती संभाजी महाराज यांचा बलिदान दिन ही महाविद्यालयात संपन्न झाला. यावेळी शिक्षक विद्यार्थी यांनी आपली मनोगते व्यक्त केली.वरिष्ठ पत्रकार व युवा क्रांती फाउंडेशनचे राष्ट्रीय प्रसिद्धी प्रमुख मार्गदर्शक,राष्ट्रीय किसान विकास मंचचे प्रदेशाध्यक्ष प्रा. सुभाष शेटे हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य जगदीश टिकले, शिक्षक अविनाश थोरात, दत्तात्रय गायकवाड,सखाराम दाभाडे महेंद्र दरवडे, शिवराम मुंजावडे, मच्छिन्द्रनाथ करंजकर, संतोष घोडे, संतोष सोनवणे, तुषार गाडेकर,अस्मिता गोडे, प्रवीण कोतवाल, हेमा कड्डे, शिल्पा नेहेरे, दर्शना राजगुरू, धनश्री तावरे, भाऊ शिंदे, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वाभिमानी परिवर्तन मंडळाचा ऐतिहासिक विजय :नंदकुमार शितोळे

**लिंपणगाव** -: अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या निवडणुकीत धक्कादायक पध्दतीने २८ वर्षापासून सत्तेत असलेल्या पुरोगामी सहकार मंडळाला पराभवाला सामोरे जावे लागले. या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये पुरोगामी सहकार मंडळाचा २१/0 च्या फरकाने दणदणीत पराभव करून स्वाभिमानी परिवर्तन मंडळ सत्तेत आले. या निवडणुकीमध्ये प्रामुख्याने मंडळाचे नेतृत्व करणारे राजेंद्र लांडे, अध्यक्ष दत्ता पाटील नारळे, कार्याध्यक्ष सुनील पंडित विजयाचे शिलेदार ठरले. मुख्य समन्वयक नंदकुमार शितोळे, सचिव रमजान हवलदार, खजिनदार शिरीष टेकाडे यांनी मंडळाच्या विजयासाठी अहोरात्र कष्ट घेतले. मंडळाच्या सर्व नेत्यांना बरोबर घेऊन नंदकुमार शितोळे यांनी समन्वयकाची भूमिका उत्तमपणे हाताळली. पुरोगामी




मंडळातून नाराज झालेले आणि स्वाभिमानी परिवर्तन मंडळामध्ये प्रवेश केलेले संचालक ज्ञानेश्वर काळे, सुरेश मिसाळ, कल्याण ठोंबरे हे देखील विजयासाठी जायंट किलर ठरले. माजी संचालक सुभाष कडलग, वसंत खेडकर, अंबादास राजळे, भीमराज खोशे, डी.आर. पानसंबळ तसेच सुधीर काळे यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. विजयानंतर माध्यमिक सोसायटीच्या दरात गुलालाची उधळण करुन विजयी जल्लोष साजरा करण्यात आला. याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष दत्ता पाटील नारळे, मुख्य समन्वयक नंदकुमार शितोळे, माजी संचालक ज्ञानेश्वर काळे, संचालक आप्पासाहेब शिंदे, बाबासाहेब बोडखे, सुनील दानवे, महेंद्र हिंगे, सुरज घाटविसावे, वैशाली दारकुंडे, सभासद प्रवीण साठे, संजय कोतकर, भानुदास दळवी, तांबे सर, पिले सर, सुधाकर सुंबे, संतोष ठाणगे, देविदास पालवे, भाऊसाहेब जेवढे, मंगेश काळे, अमोल ठाणगे, राहुल झावरे, भगवानराव राऊत, बाळासाहेब निवडुंगे, विवेक वाघमारे, गोवर्धन पांडुळे, सरोदे , प्रसाद काळे, सचिन गावडे, नितीन गडाख, अकोलकर , घोरपडे , दिनकर मुळे, मचे सर, निंबाळकर , ठाणे, भोईटे, प्रसाद शिंदे, विवेक वाघमारे, श्रीराम खाडे, अमोल क्षीरसागर, अविनाश विधाते, श्रीराम दारकुंडे, कासार सर, आशिष आचारी, देशमुख आदी सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. या निवडणुकीमध्ये जिल्ह्यातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सभासदांचे स्वाभिमानी परिवर्तन मंडळाच्या वतीने आभार मानण्यात आले. या निवडणुकीमध्ये जिल्ह्यातील तमाम शिक्षक बंधू भगिनी तसेच सामाजिक क्षेत्रातील मित्रपरिवार नातेवाईक ाजकीय नेते संस्थाचालक चालक अध्यक्ष सचिव या सर्वांनी मोलाचे सहकार्य केले त्याबद्दल आभार व्यक्त केले.

# भाव हा देवालाही जिंकत असतो : अशोक महाराज शिंदे

## वडझिरे येथे शनि अमावस्या उत्सव उत्साहात..

**पारनेर** :-शुध्द सात्विक अंत:करणाने शनैश्वराचे स्मरण करा.देव आपल्या सुखात दू:खात येईल. देवाचे नामस्मरण,अखंड चिंतन केल्याने देव नक्कीच भक्ताच्या मागेपुढे उभा राहतो.देव भक्तीचा भूकेला असतो.भाव हा देवालाही जिंकत असतो. असे निरूपण अशोक महाराज शिंदे यांनी वडझिरे येथील प्रवचनरुपी सेवेमधे सांगीतले.सुरवातीला छत्रपती संभाजी महाराज पुण्यतीथी निमीत्त महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. पारनेर तालुक्यातील प्रति शिंगणापूर असलेल्या वडझिरे येथील शनि मंदिरामधे शनि अमावस्ये निमीत्त शनिदेवाचा उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला.शनैश्वर देवस्थान उत्सव समीती,पुणेकर,मुंबईकर आणि समस्त ग्रामस्थ वडझिरे तसेच, कृष्णानंद फूड प्रॉडक्ट्स व वडझिरे युवा मंच यांचे सहकार्यामधुन या उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सकाळी ७ ते ८ देवाला अमृत अभिषेक करण्यात आला.सकाळी ९ ते ११ अशोकमहाराज शिंदे यांची वचनरुपी सेवा सादर झाली.सकाळी ११:३० ते १२:३० या वेळेमधे प्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. पारनेरसह पुणे व अहील्यानगर जिल्ह्यातील हजारो भाविक भक्तांनी मोठ्या भक्तीभावाने दर्शनारीतुन शनिदेवाचे दर्शन घेतले होते. दिवसभर भाविक भक्तांनी मोठ्या संखेने उपस्थित राहून दर्शन बारीमधे उभे राहून शनिदेवाला तेल,हार आणि नारळ वाहत शनिदेवाचे दर्शन घेतले.हभप अशोक हाराज शिंदे यांच्या प्रवचन सेवेचाही भाविकांनी लाभ घेतला. खिचडीच्या प्रसादाचे वाटप करत कार्यक्रमाची सांगता झाली.यावेळी वडझिरे ग्रामस्थ व तरुण सहकार्यांनी आपले बहुमुल्य योगदान दिले

द•ख•ल

## जिल्हा परिषद काळेगाव शाळेचा चैतन्य राज्यात पाचवा



**शेवगाव :** शासनमान्य लक्ष्यवेध फाउंडेशन संचलित घेण्यात आलेल्या लक्ष्यवेध राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षा २०२५ चा निकाल नुकताच जाहीर झाला. त्यानंतर राज्यातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी ही जाहीर करण्यात आली. यामध्ये शेवगाव तालुक्यातील काळेगाव जिल्हा परिषद शाळेचा विद्यार्थी चैतन्य शहाराम आगळे याने १५० पैकी १४२ गुण मिळवून राज्यात पाचवा क्रमांक पटकावला. संपूर्ण राज्यामध्ये एकाच वेळत घेण्यात आलेल्या या स्पर्धेस राज्यभरातून विद्यार्थी पालक व शिक्षक वर्गातूनही प्रचंड प्रतिसाद मिळाला होता.या स्पर्धेसाठी शेवगाव -नेवासा राजमार्गावरील भायगाव लगत असणाऱ्या पुनर्वसित काळेगाव जिल्हा परिषद शाळेतील अनेक विद्यार्थी या परीक्षेसाठी बसले होते. त्या सर्व विद्यार्थ्यांनी या परीक्षेत अतिशय चांगले प्राविण्य मिळवले आहे तर चैतन्य शहाराम आगळे याने गुणवत्ता यादीत राज्यात पाचवा क्रमांक मिळाला आहे. त्याच्या या यशामध्ये शाळेचे मुख्याध्यापक संदीप आहेर उपमुख्याध्यापक लक्ष्मण पिंगळे यांचे मोठे योगदान आहे. तालुकास्तरीय जिल्हास्तरीय विविध स्पर्धेत भाग घेऊन काळेगाव शाळेचे विद्यार्थी नेहमीच यश संपादन करत असतात. त्यातच या यशाने जिल्हा परिषद प्राथमिक काळेगाव शाळेची यशाची परंपरा कायम ठेवली आहे.या यशाबद्दल भायगावचे सरपंच राजेंद्र आढाव पाटील, गटशिक्षणाधिकारी तृप्ती कोलते, शिक्षण विस्तार अधिकारी डॉ. शंकर गाडेकर, शैलजा राऊळ, केंद्र प्रमुख मीरा केदार, शाळा व्यवस्थापन समिती व पालकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## शेवगावात शेअर मार्केटच्या नावाखाली मोठा घोटाळा; एसआयटी चौकशीचा ठरतोय पेच



**शेवगाव :** शेअर मार्केटच्या नावाखाली हजारो कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले असून, शेवगाव पोलीस ठाण्यात जून २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत एकूण ३८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणात अद्याप १८ गुन्ह्यांमध्ये एकही आरोपी सापडलेला नाही, तर २० गुन्ह्यांमधील २८ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. मात्र, सहा गुन्ह्यांची चौकशी अद्याप प्रलंबित आहे. युवा सेनेचे माऊली धनवडे यांनी माहितीच्या अधिकारातून धक्कादायक माहिती उघड केली आहे. या घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर शेवगाव तालुक्यात संतापाची लाट उसळली आहे. तालुक्यात विविध ठिकाणी उपोषणे, रास्ता रोको, मोर्चे आयोजित करण्यात आले असून, प्रमुख मागणी एसआयटी (विशेष तपास पथक) नेमण्याची करण्यात येत आहे. यापूर्वी आमदार मोनिकाताई राजळे यांनीही जुलै २०२४ मध्ये पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी तारांकित प्रश्नाद्वारे एसआयटी चौकशीची मागणी केली होती. यावर गृहमंत्र्यांनी स्वाक्षरी देखील केली असली, तरी अद्याप एसआयटी चौकशी सुरू झालेली नाही. त्यामुळे शेवगावच्या नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर संभ्रम निर्माण झाला आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपींपैकी एक, साईनाथ कवडे, श्रीहरी अकोलकर , यासारख्या अनेकांना अटक केल्यानंतर या घोटाळ्याची व्याप्ती अधिकच वाढताना दिसत आहे. पोलिसांकडे मोठ्या प्रमाणावर तक्रारी दाखल होत असून, गुंतवणूकदारांना न्याय मिळण्यासाठी तातडीने कठोर पावले उचलण्याची गरज आहे. शेवगावसह संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात या घोटाळ्याचा मोठा फटका बसला असून, नागरिक आपल्या गुंतवणुकीसाठी न्यायाची वाट पाहत आहेत. आता प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहून तातडीने एसआयटी चौकशी सुरू करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

## निर्भय महाराष्ट्राच्या पाथर्डी तालुकाध्यक्षपदी गोरक्ष ढाकणे



**पाथर्डी:** शहरातील गोरक्ष पांडुरंग ढाकणे यांची निर्भय महाराष्ट्र पार्टीच्या पाथर्डी तालुकाध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे.याबाबतचे पत्र संस्थापक अध्यक्ष जितेंद्र भावे यांनी दिले आहे.नागरिकांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडून भ्रष्टाचार,शिक्षण,आरोग्य,रस्ते, बेरोजगारी निर्मूलन या प्रमुख मुद्द्यांवर आपण काम करणार असल्याची माहिती तालुकाध्यक्ष ढाकणे यांनी दिली.या निवडीबद्दल गोरक्ष ढाकणे यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

# सर्व महाविद्यालयांनी 'नॅक' करणे आवश्यक आहे:धर्माधिकारी

**पारनेर :** - शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर सर्व महाविद्यालयांना नॅक मूल्यांकन करणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन डॉ. एन. एस. धर्माधिकारी यांनी केले. पारनेर येथील न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या परिसस्पर्श योजनेअंतर्गत अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाच्या वतीने ज्ञात पुनर्रचना व कार्यवाही या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ रंगनाथ आहेर हे होते. डॉ. धर्माधिकारी पुढे म्हणाले, महाविद्यालयांनी राज्य व केंद्र सरकारच्या विविध संस्थांना आवश्यक ती अचूक माहिती पाठवावी. गुणवत्तापूर्ण उपक्रमांचे आयोजन करावे. संशोधनासोबत समाजोपयोगी उपक्रम महाविद्यालयांनी आयोजित करावेत. नॅक मूल्यांकन प्रक्रीयेत प्राधान्यक्रम ठरवावेत. समाजातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडींचे विश्लेषण आपापल्या विषयाच्या दृष्टीकोनातून करता आले पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर महाविद्यालयातील प्रत्येक घटकाला करता आला पाहिजे. महाविद्यालयातील सर्व घटकांनी कसे वर्तन ठेवणे आवश्यक आहे. याची नियमावली महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी. नक मूल्यमापन प्रक्रियेत महाविद्यालयातील सर्व घटकांचा सहभाग आवश्यक असल्याचे डॉ. धर्माधिकारी यांनी सांगितले. याप्रसंगी डॉ. दिलीप ठुबे यांनी नॅक मूल्यांकनाची पुनर्रचना व होऊ घातलेले बदल याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले त्यांनी नॅकचे वेगवेगळे मानदंड व त्यामध्ये होऊ घातलेले बदल याविषयी मार्गदर्शन करताना आवश्यक ती कागदपत्रे याविषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ रंगनाथ आहेर म्हणाले, न्याक मूल्यांकन प्रक्रियेला घाबरून न जाता नियमितपणे व सातत्यपूर्ण




काम करत राहिल्यास नकची कार्यप्रणाली यशस्वीपणे पूर्ण करता येते. या कार्यशाळेसाठी प्राध्यापक महेश आहेर यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले, उपप्राचार्य डॉ तुकाराम थोपटे अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे समन्वयक डॉ. दत्तात्रय कुंभारे यांनी कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. या कार्यशाळेत प्रसंगी विविध महाविद्यालयातील प्राचार्य प्राध्यापक उपस्थित होते.

## एन. एन. सथ्था कॉलेजच्या ४६ विद्यार्थ्यांची नोकरीसाठी निवड

**अहिल्यानगर:-** एन. एन. सथ्था कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये आयोजित कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह अंतर्गत प्रतिष्ठित बहुराष्ट्रीय कंपनी मॅक्लिऑड्स फार्मास्युटिकल्सने विविध महाविद्यालयाच्या २८८ पैकी एन. एन. सथ्था कॉलेज ऑफ फार्मसी च्या ४६ विद्यार्थ्यांची निवड. या उल्लेखनीय यशामागे कठोर निवड प्रक्रिया होती, ज्यामध्ये लेखी परीक्षा, गटचर्चा आणि मुलाखतींचा समावेश होता. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना कंपनीतील क्वॉलिटी अशुरन्स, क्वालिटी कंट्रोल आणि विविध विभागांमध्ये जबाबदाऱ्या दिल्या जातील. ही प्लेसमेंट ड्राइव्ह प्रशिक्षण व



प्लेसमेंट सेलद्वारे यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आली होती, जी डॉ. जे. एस. सुर्यवंशी, प्रा. राजश्री सुम्बे आणि डॉ. शोहेब शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या यशाबद्दल आनंद व्यक्त करताना प्राचार्य डॉ. विशाल व्ही. पांडे म्हणाले, मॅकलॉइड्स सारख्या प्रतिष्ठित कंपनीमध्ये विद्यार्थ्यांची निवड होणे, ही अभिमानाची बाब आहे. हे यश विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे, समर्पणाचे आणि संस्थेने दिलेल्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे प्रतीक आहे. मॅकलॉइड्स कंपनीचे मि. भव्या देसाई यांनी कॅम्पस ड्राईव्ह आयोजित करण्यासाठी संधी दिली या साठी विद्यालयाने त्यांचे आभार मानले, तसेच या मुलाखतीसाठी कंपनीचे मि. रोहिदास पानसरे (असी. मॅनेजर) आणि मि. अश्वनी गुप्ता (सि. एक्सिकटिव्ह) यांनी विशेष सहकार्य केले. विद्यार्थ्यांना विद्यालयाचे प्राचार्य डॉ. विशाल पांडे व सर्व प्राध्यापक यांचे मार्गदर्शन लाभले या उपलब्धी साठी विद्यार्थ्यांचे, प्राचार्यांचे व सर्व प्राध्यापक यांचे संस्थे चे सचिव डॉ. शिवाजीराव काकडे, मा. जिल्हा परिषद सदस्या हर्षदाताई काकडे, विश्वस्त पृथ्वीसिंह काकडे, भाग्यश्रीताई काकडे पाटील तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. लक्ष्मण बिटाळ यांनी अभिनंदन केले.

## खेलो इंडिया स्पर्धेत सुमित सहगलने पटकावले सुवर्णपदक




**बेलापूर :** दिल्ली येथे झालेल्या पॅरा खेलो इंडिया स्पर्धेत टेबल टेनिसमध्ये सुमित सहगल याने व्हिल चेअरवर बसून खेळत सुवर्णपदक पटकावित आपली जिद्द व कौशल्याचे दर्शन घडविले. सुमित हा मुळचा फरिदाबादचा रहिवासी आहे. सध्या तो पुणे येथे आय.टी कंपनीत नोकरीत असून वाकडच्या कपिल टॉवरमध्ये वास्तव्यास आहे. सन २०१४ मध्ये झाडाला टांगला गेल्याने सुमितला अपंगत्व आले आणि व्हिलचेअर हे त्याच्यासाठी जीवन बनले. पण जिद्द व चिकाटी तसेच मेहनत असेल तर यश संपादन करता येते हे सुमितने कृतीतून दाखवून दिले. दिल्ली येथील पॅरा खेलो इंडीया स्पर्धेत त्याने हरियाणा राज्याचे प्रतिनिधित्व करताना सुवर्णपदक पटकाविले.त्याच्या या यशाबद्दल ॲड. बाळासाहेब खंडागळे, बाळकृष्ण पापले, सुभाष काकडे, नीलकंठ चौधरी, महादेव चौधरी आदिंनी अभिनंदन व कौतुक केले आहे.

## छावा चित्रपट बघून बालाजी देडगावचे ग्रामस्थ गहिवरले

**बालाजी देडगाव :** येथे सकल हिंदू समाजाच्यावतीने छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित मछावाफ चित्रपटाचे स्क्रीनिंग करण्यात आले. येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रांगणात हा चित्रपट दाखवण्यात आला. यावेळी बालाजी देडगाव येथील ग्रामस्थ, महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी चित्रपटातील अनेक दृश्य बघून ग्रामस्थांना गहिवरून आले. अनेकांना अश्रू अनावर झाले.

यावेळी सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा व छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन सुखदेव महाराज मुंगसे यांच्या हस्ते व प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. पसायदानाने सांगता करण्यात आली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आकाश चेडे, विवेक औटी, ज्ञानेश्वर केशव मुंगसे, विशाल मुंगसे, संकेत मुंगसे, श्रावण औटी, शुभम तांबे, सौरभ मुंगसे, अभय तांबे, अमोल म्हस्के, बंडाभाऊ टकले, विजय देवकाते, सोपानकाका मुंगसे, उद्धव नांगरे, रोहन म्हस्के, सिद्धार्थ रामानंद मुंगसे, किरण मुंगसे, शुभम दिक्षित यांनी विशेष परिश्रम घेतले.

## जिल्हा दुष्काळमुक्त करण्यासाठी भारतीय जैन संघटना योगदान देणार

**अहिल्यानगर:**राज्य दुष्काळमुक्त करण्यासाठी शासनाने यावर्षी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार तसेच नाला खोलीकरण व रूंदीकरण योजना राबविण्याचे निश्चित केले आहे.भारतीय जैन संघटना या कामी योगदान देणार असून अहिल्यानगर जिल्ह्यातही हे अभियान राबविण्यात येणार आहे.यादृष्टीने जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी आढावा घेतला.५ एप्रिलपर्यंत गाळमुक्त धरण,गाळ युक्त शिवार योजनेच्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देण्याचे काम पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले. या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, जिल्हा जलसंधारण अधिकारी पी.बी.गायसमुद्रे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, सहाय्यक वनसंरक्षक अश्विनी दिघे, जलसंधारण अधिकारी शिवम डापकर, भारतीय जैन संघटनेचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य आदेश चंगेडिया, बीजेएसचे अहिल्यानगर अध्यक्ष प्रशांत गांधी, अशोक पवार, मनसुखलाल चोरडिया, विश्वजीत गुगळे, संजय शिंगवी, अमोल पटवा, दर्शन गांधी, आनंद भंडारी,नरेश सुराणा,नयन पोखर्णा,संतोष गंगवाल,प्रसाद शहा,आदिनाथ पवार आदी उपस्थित होते. आदेश चंगेडिया यांनी सांगितले की,जलयुक्त शिवार अभियानात जिल्ह्यातील ३६८ गावांची निवड करण्यात आली आहे. जिल्हा प्रशासनाच्या सहकार्यातून सर्व गावांचे प्रस्ताव मंजूर करून प्रत्यक्ष काम सुरु करण्यात येणार आहे. भारतीय जैन संघटनेचे संस्थापक शांतीलाल मुथा यांच्या मार्गदर्शनाखाली संघटनेने दुष्काळमुक्त महाराष्ट्रा साठी सातत्याने योगदान दिले आहे. आताही अहिल्यानगर जिल्ह्यात दुष्काळमुक्तीसाठी भारतीय जैन संघटना सक्रिय सहभाग नोंदवणार आहे. तलावातील गाळ काढण्याचा संपूर्ण खर्च राज्य शासन करणार आहे. त्यासाठी पूर्ण राज्यात एकच दर निश्चित करण्यात आला आहे. कोणत्याही स्वयंसेवी संस्था किंवा ग्रामपंचायतीला अर्ज करून जिल्हा प्रशासनाने दिलेल्या पध्दतीनुसार काम करता येईल. तलावातून काढलेला गाळ शेतात टाकण्यासाठी अल्प, अत्यल्पभूधारक शेतकरी, विधवा, दिव्यांग शेतकरी व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शासनाकडून निश्चित दरानुसार अनुदानही दिले जाणार आहे.शासनाच्या या योजनेची गावागावात जागृती करणे, शेतकऱ्यांना गाळ नेण्या साठी प्रोत्साहित करणे, मागणी अर्ज तसेच गाळमुक्त धरण हे टेक्नॉलॉजी पोर्टल तयार करण्यासाठी भारतीय जैन संघटना व महाराष्ट्र शासन यांच्यात सामंजस्य करार झालेला आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी सरपंचांनी आपल्या गावांचा मागणी अर्ज बीजेएस डिमांड ॲपवर ऑनलाईन भरावा. बीजेएसचे जिल्हा प्रतिनिधी तसेच कार्यकर्ते स्थानिक तसेच जिल्हा प्रशासनाशी सहयोग करण्यास सज्ज झाले आहेत. जिल्ह्यातील जास्तीत जास्त गावांनी तलावातील गाळ काढण्यासाठी , नाला खोलीकरण-रूंदीकरणासाठी त्वरित अर्ज भरून द्यावेत,तसेचअधिक माहितीसाठी ु.ीहळुररअॅ.लो या वेबसाईटवर संपर्क साधावा,असे आवाहन जिल्हा प्रशासन व भारतीय जैन संघटने च्या वतीने करण्यात आले आहे.

## जिल्ह्यात ४ गावठी कट्टे व ७ काडतुसे पोलिसांकडून जप्त

**अहिल्यानगर:** जिल्हा पोलीस दलाने जिल्ह्यात विविध ठिकाणी कारवाई करत एकूण ४ गावठी कट्टे व ७ काडतुसे जप्त केली आहेत. आज शुक्रवारी दिवसभरात अहिल्यानगर शहरातील माळीवाडा व भुतकरवाडी परिसर येथे, शिर्डी शहर व राशीन (कर्जत) येथील मोहीमेत ही कारवाई करण्यात आली.यासंदर्भात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून चौघांना ताब्यात घेण्यात आले आहे. अहिल्यानगर शहरातील माळीवाडा भागात नाकाबंदी सुरू असताना कोतवाली पोलिसांच्या पथकाने एका चारचाकी वाहनातील व्यक्तीकडून गावठी कट्टा व दोन काडतुसे जप्त केली. त्याच्या मोबाईलवर हातात कट्टा असलेला डीपी लावण्यात आला होता. पोलिसांनी कारही जप्त केली आहे. अक्षय आण्णासाहेब कोबरणे (रा. गायके मळा, केडगाव, अहिल्यानगर) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याशिवाय शहरातील तोफखाना पोलीसांनी भुतकरवाडीतील उपसा केंद्र ते कराळे क्लब हाऊस रस्त्यावर राहुल मधुकर गायकवाड (२९, रा. वारुळाचा मारुती, नालेगाव, अहिल्यानगर) याच्या ताब्यातून एक गावठी कट्टा व एक काडतुस जप्त केले. त्याच्या विरोधात तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला, अतिरिक्त पोलिस अधीक्षक प्रशांत खैरे व उपअधीक्षक अमोल भारती यांनी दिलेल्या सूचनेनुसार कोतवाली पोलीस ठाण्याचे निरीक्षक प्रताप दराडे व तोफखाना पोलीस ठाण्याचे निरीक्षक आनंद कोकरे यांच्या नेतृत्वाखाली पथकाने ही कारवाई केली. शिर्डी शहर परिसरात पोलिसांचे कोंबिंग ऑपरेशन सुरू असताना सराईत गुन्हेगार महेश गोरख बोऱ्हाडे (रा. श्रीरामनगर, शिर्डी) याला पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याच्याकडून एक गावठी कट्टा व २ काडतुसे तसेच चोरीची बुलेट जप्त केली. त्याच्याविरुद्ध शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
कर्जत तालुक्यातील राशीन येथील करपडी फाटा येथून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एक गावठी कट्टा व दोन काडतुसे जप्त केली. शिवाजी विजय देवकाते (३४, रा. मदनवाडी, भिगवण, इंदापूर, पुणे) असे त्याचे नाव आहे. पोलिसांच्या चौकशीत त्याने ज्ञानेश्वर उर्फ माऊली तुकाराम कोल्हे (रा. जवळा, जामखेड) याच्याकडून कट्टा काडतुस घेतल्याचे सांगितले. ज्ञानेश्वर कोल्हे फरार आहे. या दोघांविरुद्ध कर्जत पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक दिनेश आहेर यांच्या नेतृत्वाखाली पोलिस अंमलदार अमोल कोतकर रोहित मिसाळ भाऊसाहेब काळे बाळासाहेब खेडकर मनोज लातूरकर महादेव भांड यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## प्रभू श्रीराम जन्मोत्सव निमित्ताने आज पासुन हरिनाम सप्ताह

**निघोज:** प्रभू श्रीराम जन्मोत्सव निमित्ताने निघोज येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन रविवार दि.३० ते सोमवार दि.७ एप्रिल पर्यंत केले असून हे सप्ताहाचे ४६ वे वर्षं आहे. एकनाथ महाराज चत्तर, केशव महाराज जगदाळे, पारस महाराज मुथ्था, शिवाजी महाराज जगताप, तुकाराम महाराज मुळीक, पांडुरंग महाराज घुले, तुकाराम महाराज सरकटे, आसाराम महाराज बढे, पुंडलिक महाराज जंगलेशास्त्री, डॉ. नारायण महाराज जाधव आदिंचे किर्तने होणार आहेत. ज्ञानेश्वरी पारायण - नंदू महाराज वराळ, पोपट महाराज देशपांडे, हनुमान चरीत्र - कथा प्रवक्ते - पवन महाराज तनपुरे, मृंदुगमणी - मोहन महाराज घुले, तुषार महाराज लाळगे, हार्मोनियम - नारायण पवार, गायनाचार्य - साईनाथ महाराज काळे, रुपेश महाराज रुपवते, तुषार महाराज गुंड, नंदू महाराज वराळ, श्रीहरी महाराज पवार, धनंजय महाराज कांडेकर, गजानन महाराज शेजवळ, बबन महाराज थोरात, किर्तनसाथ व टाळकरी - श्रीराम मंदिर हरिपाठ मंडळ निघोज, सांगवीसुर्या, जवळा, देवीभोयरे, वडझिरे, वडनेर, पठारवाडी, टाकळी हाजी, भाकरेवाडी, पांढरकरवाडी, बोदगेवाडी, शिववाडी, मोरवाडी आदी भजनी मंडळ साथ करणार आहेत. दररोज महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून यासाठी मोठ्या प्रमाणात लोकसहभागातून अनेक मान्यवर, विविध संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थ यामध्ये सहभागी झाले आहेत. शनिवार दि.५ रोजी सकाळी सहा ते बारा या वेळेत आसाराम महाराज बढे यांचे रामजन्माचे किर्तन होणार आहे. सोमवार दि.७ रोजी सकाळी दहा ते बारा या वेळेत नारायण महाराज जाधव यांचे काल्याचे किर्तन होऊन या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे. निघोजच्या पेठेमध्ये असणाऱ्या श्रीराम मंदीराजवळ हा अखंड हरिनाम सप्ताह होत असल्याने दरवर्षी या अखंड हरिनाम सप्ताहाला भावीकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे तसेच दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा नामवंत किर्तनकारांची उपस्थीती असल्याने या अखंड हरिनाम सप्ताहाचा नावलौकिक राज्यात झाला आहे. या अखंड हरिनाम सप्ताहाचा भावीकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन अखंड हरिनाम सप्ताह समीती, निघोज व मुंबईकर मंडळ व कुलाबाकर मंडळ ग्रामस्थांनी केले आहे.

## 'अभियांत्रिकी पीक सुधारण्याचे वनस्पती अनुवंशिक शक्तिशाली साधन'

**पारनेर :**न्यू आर्टस्, कॉमर्स अण्ड सायन्स कॉलेज पारनेर येथे वनस्पतिशास्त्र विभागाने ''प्लांट जेनेटिक इंजिनीअरिंग'' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित केले होते. अनुवांशिक अभियांत्रिकी, तत्त्वे, आणि पीक सुधारण्यासाठीचे परिणाम या विषयांवर भारत चौधरी यांनी विद्यार्थ्यां समवेत चर्चा केली. वनस्पती आनुवंशिकी म्हणजे वनस्पतींमध्ये अनुवांशिक गुणधर्माचे अभ्यास आणि त्यातून होणाऱ्या बदलांचा अभ्यास करणे. वनस्पतींच्या डीएनए , गुणसूत्रे आणि जीन्स यांचा अभ्यास करून, वनस्पतींच्या विविध वैशिष्ट्यांवर (उदा. रंग, आकार, रोगप्रतिकारशक्ती) त्यांचे काय परिणाम होतात, हे तपासले जाते. वनस्पती आनुवंशिकीचे उपयोग रोगप्रतिकारशक्ती वाढवणे, उत्पादन वाढवणे, नव्या जाती विकसित करणे, पर्यावरणास अनुकूल वनस्पती विकसित करणे याबद्दल अधिक माहिती विद्यार्थ्यांना दिली. सदर विशेष व्याखानाप्रसंगी वनस्पतिशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. आर. एन. देशमुख यांनी आपल्या दैनंदिन जीवनात जैवतंत्रज्ञान कसे अंतर्भूत आहे हे सांगितले.''बायोटेक्नॉलॉजीमध्ये वनस्पती अनुवांशिक अभियांत्रिकी हे अतिशय विकसनशील क्षेत्र आहे.जैवतंत्रज्ञानाला फार्मास्युटिकल तसेच कृषी क्षेत्रात अधिक वाव आहे.'' असे मत समन्वयक प्रा. प्रांजली बोरुडे यांनी मांडले. व्याख्यानासाठी प्रा.एस एल खपके, प्रा.टी एस चिकणे , प्रा. आर ए शेख, प्रा.एम ए वाबळे,प्रा.डी डी पवार उपस्थित होते.समन्वयक प्रा. प्रांजली बोरुडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार मानले.



## कुरुमकर यांनी पत्रकारितेतून शैक्षणिक क्षेत्राला न्याय दिला :प्राचार्य आनंदा पुराणे

**लिंपणगाव**-श्रीगोंदा तालुक्यातील ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार कुरुमकर यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्राला वेळोवेळी न्याय दिला असल्याचे गौरवोद्गार प्राचार्य आनंदा पुराणे यांनी व्यक्त केले. जिल्ह्यातील अग्रगण्य दैनिक समजल्या जाणाऱ्या दैनिक राष्ट्र सह्याद्री समूहाकडून ग्रामीण भागात बातमीच्या माध्यमातून सर्वसामान्यांना न्याय न्यायाची भूमिका घेत सतत शैक्षणिक व पत्रकारिता ध्यास पत्रकार कुरुमकर यांच्याकडून घेतला जातो आहे. त्या प्रित्यर्थ दैनिक राष्ट्र सह्याद्री समूहाकडून उत्कृष्ट बातमीदार म्हणून कुरुमकर यांना सन्मानित करण्यात आले.

अशा या सन्मानर्थींचा श्री व्यंकनाथ विद्यालयाकडून विद्यालयाचे प्राचार्य ए एल पुराणे यांनी यथोचित असा विद्यार्थ्यांसमवेत सन्मान केला.




प्राचार्य पुराणे यांनी पत्रकार कुरुमकर यांच्या कार्याविषयी बोलताना सांगितले की; शैक्षणिक क्षेत्रातील कोणतीही नावीन्यपूर्ण व उपक्रमशील बातम्या असतील तर त्या निश्चितच विविध वृत्तपत्राच्या माध्यमातून प्रसिद्ध करून गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांना प्रोत्साहित करण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून केला जात आहे.

त्यांचे शैक्षणिक कार्य देखील प्रशांशनीय असून सर्वांशी त्यांनी मैत्रीपूर्ण संबंध देखील जोपासले आहेत. असे गौरवोद्गार प्राचार्य पुराने यांनी केल्याचे सांगून त्यांना पत्रकारिता क्षेत्रात उज्वल भविष्य लाभो अशा शुभेच्छा प्राचार्य पुराणे यांनीव्यक्त केल्या.

यावेळी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक शिवाजीराव इथापे यावेळी गुणगौरव पर भाषणात म्हणाले की; पत्रकार कुरुमकर हे अत्यंत हसतमुख व्यक्तिमत्व. बातमी कशी शोधायची व त्या बातमीला स्वरूप कसे आणायचे हे पत्रकार कुरुमकर यांच्याकडून निश्चित शिकले पाहिजे. तालुक्याची नव्हे तर जिल्ह्याची देखील भौगोलिक सामाजिक व प्रशासकीय पातळीवर त्यांनी आपल्या बातमीच्या माध्यमातून नावलौकिक मिळवला. त्यांना राष्ट्र सह्याद्री समूहाने ग्रामीण भागातून उत्कृष्ट बातमी लेखन व दैनिक राष्ट्र सह्याद्री समूहाचे वेळोवेळी केलेल्या आदेशाचे पालन त्यामुळे ते निश्चितच गौरवास्पद पात्र ठरल्याचे सांगून त्यांना उत्कृष्ट बातमीदार म्हणून पुरस्कार मिळाल्याने आम्हाला निश्चितच अभिमान वाटतो. असे सांगून त्यांना पुढील कार्यास श्री इथापे यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या.

या सन्मान सोहळयाला विद्यालयाचे प्राचार्य ए एल पुराणे; ज्येष्ठ शिक्षक ज्ञानदेव धायगुडे; शिवाजीराव इथापे; संतोष शिंदे; पांडुरंग बोडखे; तुषार नागवडे; अभिषेक उदमले; मनोज कांबळे; नौशाद शेख; अश्विनी शेळके; सविता मगर; सायली गायकवाड; प्रा. पुष्कलता पाचपुते; प्रा. निसार शेख; प्रा सचिन लगड; अस्मिता वाबळे; श्रीमती राऊत ; शुभम सोनवणे; प्रज्ञा राहींज; राहुल येरकळ; एकनाथ नेटवटे आदींसह विद्यार्थी; शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक शिवाजीराव इथापे यांनी

## घोड धरणामध्ये विषारी औषध व केमिकल टाकून मासेमारी, नागरिकांमध्ये संताप

**श्रीगोंदा** - श्रीगोंदा व शिरूर तालुक्यातील घोड जलाशयामध्ये काही स्थानिक लोक व काही मासेमारी करणारे व्यावसायिक पाण्यामध्ये विषारी औषधे व केमिकल टाकून मासेमारी करत असल्याचा संशय घोड धरणाचे व्यवस्थापक शांताराम शितोळे मु.पो. शिंदोडी ता.शिरूर जिल्हा पुणे यांना संशय आला असून त्यांनी याप्रकरणी श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी पोलीस स्टेशन येथे लेखी तक्रारी अर्ज दिला आहे त्यामध्ये त्यांनी काही संशयित यांची नावे दिली आहेत व मरण पावलेले मासे तसेच परिसरामध्ये सापडलेले औषधे व केमिकल च्या बाटल्या यांचे फोटो पुरावा म्हणून सादर केल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे . सविस्तर वृत्त असे की श्रीगोंदा व शिरूर तालुक्याच्या सीमेवर असणाऱ्या घोडनदी वरती असणाऱ्या घोड धरणामध्ये काही दिवसांपासून मासेमारी करणारे स्थानिक व काही मासेमारी करणारी व्यावसायिक कोणतीही परवानगी न घेता पाण्यामध्ये विषारी औषधे व केमिकल टाकून मासेमारी करत असून व ते मासे परस्पर विक्री करत असल्याचे निदर्शनात आले, असून विषारी औषध व केमिकल पासून पकडलेले मासे हे शरीरासाठी हानिकारक असून त्यामुळे मानवी जीवनावर दुष्परिणाम होऊ शकतो तसेच पाण्यामध्ये विषाचे प्रमाण वाढवून भविष्यामध्ये शेतीला व जलचर प्राणी तसेच पक्षी यांना धोका निर्माण होऊ शकतो .त्यामुळे अशा अनैसर्गिक पद्धतीने मासे पकडणाऱ्या मासेमारी करणाऱ्या व्यवसायकांवरती ताबडतोब कारवाई करावी अशी मागणी या पत्राद्वरे करण्यात आलेली आहे.




दैनिक झुंजार जनता

४

रविवार दि.३०/०३/२०२५





द•ख•ल

# किरकोळ वादातून १५ वर्षीय भाच्याचा खून

**पुणे** : किरकोळ वादातून मामाने १५ वर्षीय भाच्याच्या छातीवर चाकूने वार करुन खून केल्याची घटना सिंहगड रस्त्यावरील नऱ्हे भागात शुक्रवारी रात्री घडली. पसार झालेल्या मामाला सिंहगड रस्ता पोलिसांनी अटक केली.गजानन गजकोश (वय १५) असे खून झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी मेधनाथ अशोक तपासे (वय ४१, रा. मानाजीनगर, नऱ्हे) याला अटक करण्यात आली. याबाबत आरोपी मेघनाथचा मेहुणा मंगेश दत्तात्रय ओव्हाळ (वय ३१, रा. कृष्णाईनगर, मानाजीनगर गणपती मंदिराजवळ, नऱ्हे) यांनी सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. गजानन हा मामा मेघनाथ याच्याकडे राहण्यासाठी आला होता.

शुक्रवारी रात्री त्याचा मामाच्या मुलाशी वाद झाला. वादातून मेघनाथने भाचा गजाननला पट्ट्याने बेदम मारहाण केली. त्यानंतर स्वयंपाकघरातील चाकूने त्याच्या छातीवर वार केला. चाकूने भोसकल्याने मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव झाला. गंभीर जखमी अवस्थेतील गजाननला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. या घटनेची माहिती मिळताच परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त संभाजी कदम यांनी घटनास्थळी भेट दिली.

# गंगापूर शहरात आशा दिवस उत्साहात

**गंगापूर** : तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाकडून आशा डे उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन गंगापूर तहसीलदार नवनाथ वगवाड यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून व दिप प्रज्वलीत करून करण्यात आले. यावेळी आशाताईंच्या विविध स्पर्धा रांगोळी,निबंधलेखन,गायन,नृत्य ,एकांकीका घेण्यात आल्या.तालुका आरोग्य डॉ.तुपे यांनीही छत्रपती



शिवाजी महाराजांवरील पोवाडा सादर केला. प्राथमिक आरोग्य केंद्र सिध्दनाथ वाडगावच्या आशांनी बालविवाह प्रतिबंधक नाटीका सादर केली. बालविवाह, लिंगनिदान व गर्भपात व इतर विषयावर डॉ. तुपे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात जयश्री कुलकर्णी उपजिल्हा रुग्णालय गंगापूर, डॉ.तुपे तालुका आरोग्य अधिकारी , नवनाथ वगवाड तहसीलदार गंगापूर यांनी मार्गदर्शन केले.

# वक्फ दुरुस्ती विधेयकविरोधात मुस्लिम समाजाचा निषेध

**गंगापूर :** शहर व तालुक्यातील मौलाना व मुस्लिम तसेच जमीयतुल उलेमा-ए-हिंदच्या वतीने वक्फ बिल दुरुस्ती विधेयकाच्या विरोधात शांततापूर्ण निषेध नोंदवण्यात आला. रमजान महिन्यातील शेवटच्या जुमातुल विदाच्या दिवशी मौलाना व मुस्लिम बांधवांनी हाताला काळी फिती लावून मस्जिदमध्ये नमाज अदा केली.

या आंदोलनाचे आयोजन जमीयतुल उलेमा-ए-हिंदच्या वतीने युसूफ इब्राहिम सय्यद, ता.अ. यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. गंगापूर शहरातील मस्तुमियाँ, एकखाना, जामा मस्जिद, मलंग मस्जिद, मोहम्मदिया मस्जिद, रेहाना मस्जिद तसेच खेड्यांतील विविध मस्जिदींमध्ये हा निषेध नोंदवण्यात आला.गंगापूर शहर आणि तालुक्यातील हा निषेध कार्यक्रम शांततेत पार पडला.

# लोकसेवा विकास आघाडीच्या वतीने आज इफ्तार पार्टी

**श्रीरामपूर:** दरवर्षीप्रमाणे यंदाच्या वर्षीही मुस्लीम बांधवांच्या पवित्र रमजान सणानिमित्त लोकसेवा विकास आघाडीच्या वतीने आज रविवार (ता.३०) रोजी सायं.६.३० वा. श्रीरामपूर येथील सय्यद बाबा चौक, जामा मस्जिद येथे माजी आ.भानुदास मुरकुटे यांचे उपस्थितीत इफ्तार पार्टी संपन्न होणार असल्याची माहिती शहर अध्यक्ष नाना पाटील यांनी दिली आहे.

अशोक कारखान्याचे चेअरमन माजी आमदार भानुदास मुरकुटे यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. आज रविवार (ता.३०) रोजी सायं. ६.३० वा. जामा मस्जिदमध्ये संपन्न होणाऱ्या इफ्तार पार्टीस मुस्लीम बांधवांनी व लोकसेवा विकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांचे वतीने करण्यात आले आहे.

# अभ्यासाबरोबरच सामाजिक बांधिलकी महत्वाची : अभिनेते उदगीरकर

## सुशीलामाई काळे महाविद्यालयात पारितोषिक वितरण

**कोळपेवाडी :** आजही ग्रामीण भागाशी निसर्गाची नाळ जोडलेली आहे. काळे परिवाराला कर्मवीर शंकररावजी काळे यांच्या पासून समाजकारणाची व शिक्षण सेवेची मोठी परंपरा आहे. तुम्ही भाग्यवान असून सौ.सुशीलामाईंच्या मायेचे पांघरुण तुमच्यावर आहे.अतिशय रम्य वातावरणात मिळत असलेल्या शिक्षणाचा फायदा घ्या आणि अभ्यासाबरोबरच सामाजिक बांधिलकी लक्षात येऊन पर्यावरणाचे रक्षण करा असा मौलिक सल्ला प्रसिद्ध चित्रपट अभिनेते चिन्मय उदगीरकर यांनी दिला. कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीच्या सौ.सुशिलामाई काळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात संस्थेच्या सचिव सौ.चैतालीताई काळे यांच्या मार्गदर्शनाखाली वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रम व वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले प्रसिद्ध चित्रपट अभिनेते चिन्मय उदगीरकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सौ.विजया गुरसळ या होत्या. ते पुढे म्हणाले की, जे चमकतात त्यांच्यावर टीका होतेच त्यावेळी ती टीका सहन करून आपले कार्य सातत्याने सुरु ठेवणे महत्वाचे असते हे महाविद्यालयीन जीवनात शिकायला मिळते. व्हाटस ॲप, फेसबुक, इंस्टाग्राम हे नवीन विद्यापीठ जन्माला आली असली तरी ही विद्यापीठ फक्त माहिती देण्याचे काम करत आहेत. माहिती हे ज्ञान नाही व हि हुशारी देखील नाही. त्यावर तुम्ही जो विचार करतात ती तुमची खरी हुशारी आहे आणि हि हुशारी तुमच्या अंतर्मनातून आली पाहिजे परंतु दुर्दैवाने असे होत नाही अशी खंत त्यांनी व्यक्त केली. शहरी भागात राहणाऱ्या युवा वर्गामध्ये मानसिक समस्यांचे प्राबल्य वाढत चालले असून हि गंभीर समस्या आहे यावर एकच उपाय आहे तो म्हणजे खेड्याकडे चला,ग्रामीण भागाकडे चला, कारण आजही ग्रामीण भागाशी निसर्गाची नाळ जोडलेली आहे.गोदावरी आईला आपण आपली आई म्हणतो.जोपर्यंत निसर्गाशी आपली नाळ भक्कम आहे सुदृढ आहे तोपर्यंत आपण सुदृढ आणि भक्कम राहणार आहे. त्याकरिता पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी आत्तापासूनच



गोदावरी आई, नदीच, पाण्याच, झाडाचं आणि पर्यावरणाचा बचाव केल्याशिवाय पर्याय नसल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी गोदामाई प्रतिष्ठान कोपरगावचे अध्यक्ष आदिनाथ ढाकणे, नारायण बारे, सुरेगावचे उपसरपंच दीपक कदम,शरद ढोमसे आदी मान्यवर उपस्थित होते.अहवाल वाचन कार्याध्यक्ष प्रा.विनोद मैंद यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.उमाकांत कदम यांनी केले. सूत्रसंचालन, प्रा.सागर मोरे यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

# दिवे परिसरात पुणे - पंढरपूर पालखी महामार्गावरिल गटाराला दुसऱ्यांदा भगदाड

**दिवे प्रतिनिधी** :- पुणे पंढरपूर या पालखी महामार्गाच्या कामाला सध्या गती आली आहे दिवे घाटाच्या पुढिल रस्त्याचे काम सध्या अंतिम टप्प्यात आहे ठिकठिकाणी उड्डाण पुलांची कामे युद्ध पातळीवर सुरु आहेत दिवे परिसरात रस्त्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी गटाराचे काम वेगात सुरु आहेत परंतु हि कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याचे सिद्ध झाले आहे दिवे परिसरात मधल्या काळात मधुबन डेअरी जवळ जाणाऱ्या रस्त्यावर गटाराच्या स्लॅबला भलेमोठे भगदड पडले होते तर आता परत दिवे गावात जाणा-या रस्त्यावर गटाराच्या स्लॅबला भले मोठे भगदड पडले



दिवे ता.पुरंदर येथे गटाराला पडलेले भगदड याठिकाणी पाहणी करताना दिवे ग्रामस्थ

आहे त्यामुळे या कामाच्या दर्जाबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे गेले अनेक दिवसांपासून याठिकाणी गटाराचे काम सुरु असून नागरिकांना येण्याजाण्यासाठि मोठी अडचण येत होती काम संपतेन संपते तोच भगदड पडल्याने कामाच्या दर्जाबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे याठिकाणी मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे चारच दिवसात स्लॅबला जर भगदड पडत असेल तर भविष्यात या ठिकाणाहून वाहतूक होणार कशी अशी शंका नागरिक उपस्थित करत आहे वास्तविक दिवे गाव हे मोठ्या लोकसंखेचे गाव आहे शिवाय प्रादेशिक परिवहन मंडळाचे कार्यालय छोटे मोठे उद्योग व्यवसाय गोदामे या परिसरात आहेत जर चारच दिवसात भगदड पडले तर भविष्यात याठिकाणी वाहतूक धोक्याची ठरणार आहे.याठिकाणी दिवे ग्रामस्थांनी पाहणी करत आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे यावेळी पोलीस पाटील बाळासाहेब झेंडे, बापू भापकर,गणपत शितकल,अनिल भापकर, संभाजी झेंडे,बबन राऊत, महादेव गायकवाड,रोहिदास

ठेकेदाराने याठिकाणी गटाराचे काम मजबूत करणे गरजेचे आहे अशाप्रकारे दर्जाहिन काम करून नागरिकांच्या जीवाशी खेळ थांबवावा अन्यथा ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. गणपत शितकल सामाजिक कार्यकर्ते दिवे.

# वणवा लावणाऱ्यांवर वनविभागाच्या धडक कारवाईत एकजण ताब्यात

**आंबेगाव:**येथील ढाकाळे येथील वनविभागाच्या वनपरिक्षेत्रात वन कक्ष क्र. २१२ मध्ये अज्ञात इसमाने आग लावल्याने तृतीय वर्ष रोपवनाचे जळून खाक झाल्याने त्यामुळे वनवा लावणाऱ्यांची पकड मोहीम सुरू होती. वनवा लावणाऱ्या संदर्भात गोपनीय माहिती वनविभागाच्या अधिकाऱ्यांच्या हाती आल्यानंतर सदर वणवा मौजे ढाकाळे येथील दत्तात्रय गोविंद वाजे याने लावला असल्याचे आढळून आल्याने त्यास भारतीय नागरिक सुरक्षा अधिनियम २०२३ अंतर्गत नोटीस देऊन त्याचेवर कारवाई सुरु करणेत आली आहे. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी घोडेगाव श्री. कुणाल लिमकर म्हणाले, आरोपी दत्तात्रय गोविंद वाजे याच्या वहिवाटीचे क्षेत्र मौजे ढाकाळे येथील राखीव वनास लागून आहे. त्याने निष्काळजीपणाने आपल्या शेतातील गवत पेटवून दिल्याने सदर आग वनक्षेत्रात पसरून रोपवनाचे नुकसान झाले आहे. शासकीय राखीव वनक्षेत्रात अवैध प्रवेश करुन वणवा लावणे भारतीय वन धिनियम १९२७ अन्वये प्रतिबंधित असून त्याचे उल्लंघन करणाऱ्यास २ वर्षापर्यंत कारावास तसेच रू. ५०००/-



पर्यंतच्या द्रव्यदंडाची तरतुद असून सदर गुन्हा अजामिनपात्र स्वरूपाचा आहे. सदर कारवाई जुन्नर वनविभागाचे उपवनसंरक्षक श्री. अमोल सातपुते यांचे मार्गदर्शनाखाली श्री. अमृत शिंदे, सहाय्यक वनसंरक्षक, वनविभाग जुन्नर, श्री. कुणाल लिमकर, वनपरिक्षेत्र अधिकारी घोडेगाव, वनपाल श्री. झांझरे, श्री गिहे तसेच वनरक्षक श्री. मुरूडकर, श्री. गायकवाड, श्री. कंधारकर, श्रीम. तांबारे यांनी पार पाडली असून पुढील तपास श्री. लिमकर हे करत आहेत. जुन्नर वनविभागातील आंबेगाव, जुन्नर, शिरुर व खेड तालुक्यामध्ये भौगोलिक क्षेत्राच्या तुलनेत वनाचे वृक्षाच्छादन केवळ १० टक्के इतकेच आहे. दरवर्षी वणव्यामुळे नैसर्गिक वनसंपत्तीचे मोठे नुकसान होते. सदर वृक्षाच्छादन वाढविणेसाठी वनविभाग विविध स्तरावर प्रयत्न करत आहे, मात्र वणव्यामुळे या नैसर्गिक वनसंपत्तीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. वनक्षेत्रास आग / वणवा लावणाऱ्यांवर वनविभागाने धडक कारवाई सुरु केली असून त्यासाठी संवेदनशील भागात ट्रॅप कॅमेरे, ड्रोन सर्वेक्षण तसेच वन वणवा प्रतिबंधक भरारी पथकामार्फत नजर ठेवली जात आहे. यास्तव सर्वांना आवहान करणेत येत आहे की, कोणीही शासकीय राखीव वनाात अवैध प्रवेश करु नये, वनास आग लावु नये तसेच वनक्षेत्राचे लगत शेती असणाऱ्या शेतकऱ्यांनी त्यांचे मालकीच्या शेतातील राब / गवत पेटविताना वनविभागाचे कर्मचाऱ्यांना पूर्व कल्पना द्यावी. तसेच सदर आग वनक्षेत्रात जाणार नाही याची दक्षता घ्यावी, अन्यथा संबंधितांवर भारतीय वन अधिनियम १९२७, महाराष्ट्र वन नियमावली २०१४ तयेच वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अंतर्गत कडक कारवाई करण्यात येईल. वन्यजीवप्रेमी, निसर्गप्रेमी तसेच जागरूक नागरीकांनी वणवा लावणाऱ्या अशा विकृत मानसिकतेच्या लोकांची नावे वनविभागस कळविल्यास त्यांना प्रोत्साहनपर बक्षीस देऊन त्यांचा सन्मान करणेत येईल.

# उन्हाचा पारा वाढल्याने माठांना मागणी वाढली

**निरगुडसर :** गेल्या काही दिवसांपासून उन्हाची तीव्रता जाणवत आहे. वाढत्या तापमानामुळे आरोग्यदायी असे थंड पाणी पिण्यासाठी माठांची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. ग्रामीण भागात कुंभारवाड्यात, रस्त्याच्या कडेला थाटलेल्या दुकानांमध्ये माठ खरेदी करण्यासाठी नागरिकांची गर्दी करत आहेत.यंदा फेब्रुवारीपासूनच उन्हाचा पारा चढण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे आरोग्यदायी थंड पाण्यासाठी माठांना मागणी वाढली आहे. आधुनिक काळात घरात नवीन-नवीन इलेक्ट्रॉनिक उपकरणांमुळे जुन्या वस्तू कालबाह्य होत आहेत, मात्र या बदलात ग्रामीण भागात अजूनहि पाण्याचा माठ तग धरून आहे. काहीजण फ्रिजपेक्षा माठाचे गार पाणी पिण्यास प्राधान्य देत आहेत. मातीच्या भांड्यातून थंड केलेले पाणी पिणे हा थंडगार रेफ्रिजरेटरमधील पाण्यापेक्षा चांगला पर्याय आहे. माठातील पाण्याचे तापमान आदर्श असल्याने ते पचनास मदत करते आणि पोट फुगणे आणि बद्धकोष्ठता यासारख्या समस्या टाळते. माठ बनवताना कोणत्याही रसायनांचा वापर केला जात नाही. ज्यामुळे ते पाणी पिण्यासाठी आणि साठवण्यासाठी चांगले बनू शकते. तसेच फ्रिज मधील थंड पाण्यामुळे उन्हाळ्यात विजेचे बिल जास्त येते. आजही ग्रामीण भागात अनेक गरीब ,मध्यमवर्गीय कुटुंबात फ्रिज पहावयास मिळत नाही त्यामुळे या घरात उन्हाळ्यात माठाचे पाणी पिले जात आहे. तसेच गेल्या काही दिवसात ज्या कुटुंबाकडे फ्रीज आहे ती कुटुंबे देखील आरोग्य चांगले राहावे यासाठी माठातले

यावर्षी उन्हाळा कडक असल्याने माठांना चांगली मागणी आहे. मी गेल्या अनेक वर्षापासून माठांचा व्यवसाय करत आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी पंधरा ते वीस रुपयांनी भाव वाढले आहेत. मोठा नक्षीदार माठ ५०० ते ५५० रुपये, नक्षीदार लहान माठ २५० पासून पुढे, काळा माठ - मोठा ३०० ते ४०० रुपये, लाल माठ ३००ते ३५०, या . त्याचबरोबर मातीचा तवा, बिर्याणी भांडे, मातीची इतर भांड्यांनाही मागणी आहे.

**हेमलता अंकुश तुळेकर, माठ व्यवसायिक, निरगुडसर**

# उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याचे नूतनीकर अनावरण

**बारामती (दि.२८)** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळा नुतनीकर अनावरण समारंभ व शेतकरी मेळावा (दि:२८) रोजी आयोजित करण्यात आला होता. साखर कारखान्यांनी ऊस उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांना कृत्रिम बुद्धीमत्ता (एआय) तंत्रज्ञान उपलब्ध करुन देण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले. माळेगाव सहकारी साखर कारखाना येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नूतनीकरण करण्यात आलेल्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण आणि शेतकरी मेळावा कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते.यावेळी कारखान्याचे चेअरमन अँड. केशवराव जगताप, माजी चेअरमन बाळासाहेब तावरे, सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन पुरुषोत्तम जगताप, छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन प्रशांत काटे, पुणे जिल्हा सहकारी बँकेचे संचालक संभाजी होळकर, दत्तात्रय येळे, रणजीत तावरे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विश्वासराव देवकाते, सोमेश्वर सहकारी कारखान्याचे माजी चेअरमन राजवर्धन शिंदे, माळेगाव साखर कारखान्याचे संचालक योगेश जगताप, बारामती तालुका दूध उत्पादक संघाचे चेअरमन संजय कोकरे, आदी उपस्थित होते. जनतेला गुढीपाडवा आणि रमजान ईदच्या शुभेच्छा देऊन उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याला रयतेचे राज्य म्हणून ओळखले



जात होते. त्यांनी निर्माण केलेल्या आदर्शांचे स्मरण करून राज्यशासन काम करत आहे. महापुरुषांच्या पुतळ्यांच्या बाबत आवश्यक ती खबरदारी घेण्याचे काम नेहमीच होणे गरजेचे असून माळेगाव सहकारी साखर कारखान्याने १९८४ साली उभारलेल्या या पुतळ्याचे नूतनीकरण करून घेतली आहे. ते पुढे म्हणाले, या वर्षीच्या अर्थसंकल्पात शेतकरी, उद्योग, आरोग्य, रोजगार, शिक्षण आदी बाबींना अधिकचे महत्त्व देण्याचा प्रयत्न केला आहे. विकास कामांवर परिणाम होऊ न देता महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. कृषी पंपांना वीजबील माफी, लाडकी बहीण योजनेला निधीची तरतूद आदींसाठी तरतूद केली आहे. शेतकऱ्यांच्या पीक कर्जावरील व्याजाची सवलतीची सुमारे बाराशे कोटी रुपयांची रक्कम जिल्हा सहकारी बँकांना देण्यात आली असून त्याचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी ३१ मार्चपूर्वी पीक कर्ज भरावे, असे आवाहनही त्यांनी केले. दुधाच्या अनुदानाची रक्कम दुध संस्थांपर्यंत पोहोविण्यात येत असून त्याचा

# साखर कारखान्यांनी कार्यक्षेत्रामधील ऊस शेतीमध्ये ‘एआय’चा वापर वाढविण्यासाठी पुढाकार घ्यावा :उपमुख्यमंत्री अजित पवार

**बारामती** :- साखर कारखान्यांनी ऊस उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांना कृत्रिम बुद्धीमत्ता (एआय) तंत्रज्ञान उपलब्ध करुन देण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले. ावेळी कारखान्याचे चेअरमन अँड. केशवराव जगताप, माजी चेअरमन बाळासाहेब तावरे, सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन पुरुषोत्तम जगताप, छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन प्रशांत काटे, पुणे जिल्हा सहकारी बँकेचे संचालक संभाजी होळकर, दत्तात्रय येळे, रणजीत तावरे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विश्वासराव देवकाते, सोमेश्वर सहकारी कारखान्याचे माजी चेअरमन राजवर्धन शिंदे, माळेगाव साखर कारखान्याचे संचालक योगेश जगताप ,व्हाईस चेअरमन राजेंद्र ढवाण पाटील, बारामती तालुका दूध उत्पादक संघाचे चेअरमन संजय कोकरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन विश्वासराव आटोळे, खरेदी विक्री संघाचे चेअरमन ॲड. रवींद्र माने, यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी, कारखान्याचे सभासद शेतकरी, कामगार आदी उपस्थित होते.यावर्षी ऊस पीकासाठी कृत्रिम बुद्धीमत्तेचे (एआय) आधुनिक तंत्रज्ञान बारामती येथील कृषी विज्ञान केंद्राने आणले असून त्याचा ऊस उत्पादनवाढीसाठी तसेच पाण्याच्या कार्यक्षम वापरासाठी मोठा फायदा होणार आहे. हे



पाहता या वर्षीच्या अर्थसंकल्पात ५०० कोटी रुपयांची तरतूद केली असून आवश्यकतेनुसार पुढील पुरवणी मागण्यांमध्ये अधिकची तरतूद करण्यात येईल. एआय तंत्रज्ञान सोयाबीन, कापूस, केळी, फळबागा आदींसाठीही वापरण्यात येईल, असेही म्हणाले. लवकरच पुण्यात ॲग्री हॅकेथॉन भरविण्यात येणार असून त्या माध्यमातून राज्यातील युवा संशोधक, नवोद्योग (स्टार्टअप्स), कृषी तज्ज्ञ, शेतकऱ्यांना एकत्र आणून आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतीसंबंधी समस्या सोडविण्याचा प्रयत्न खासगी क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मदतीने राज्यशासन करणार आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पन्न कसे वाढेल, खर्च कसा कमी होईल यासाठी नवकल्पक संशोधकांना चालना मिळण्यासाठी या हॅकेथॉनचा उपयोग होणार असून येत्या जूनपर्यंत अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न आहे, असेही ते म्हणाले.तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना स्मार्ट शेती, हवामान अंदाज, स्वयंचलित सिंचन तंत्रज्ञान, पाण्याचे योग्य व्यवस्थापन, सेंद्रिय खतांचा योग्य वापर, कीड नियंत्रणासाठी तंत्रज्ञानाचा वापर आदींवर संशोधन करुन ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अधिक उत्पादनक्षम बनविण्याचा मानस आहे. राज्यशासन साखर कारखान्यांना आणि त्या माध्यमातून उत्पादकांना दिलासा देण्यासाठी काम करत असून केंद्र शासनाकडे पाठपुरावा केल्यामुळे मोलॅसिसवरील २८ टक्के उत्पादन व सेवा कर (जीएसटी) ५ टक्क्यावर आणला गेला आहे. राज्यशासनाच्या पाठपुराव्यामुळे कारखान्यांवर आकारण्यात आलेला सुमारे २० वर्षापासूनचा आयकर केंद्र शासनाने माफ केल्यामुळे कारखान्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. कारखान्यांचे इथेनॉल, सहवीज निर्मिती प्रकल्पांबाबतचे प्रश्न सोडविण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रयत्न करण्यात येतील, असेही ते म्हणाले. माळेगाव कारखान्याने उच्च दराची परंपरा राखल्याबद्दल अभिनंदन करुन पवार पुढे म्हणाले. कारखान्याने २०२२-२३ मध्ये प्रतीक्विंटल ३ हजार ४११ रुपये, २०२३-२४ च्या गळीत हंगामासाठी राज्यात विक्रमी ३ हजार ६३६ रुपये दर दिला आहे. माळेगाव व सोमेश्वर सहकारी साखर कारखान्यांच्या कार्यक्षेत्रात अधिकचा ऊस उपलब्ध व्हावा यासाठी जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या बंद पाईपलाईनच्या कामासाठी राज्यशासनाने ४६० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. कऱ्हा-नीरा उपसा सिंचन योजना उपसा सिंचन योजनेच्या सर्वेक्षणास निधी देण्यात आला असून त्या कामाला सुरूवात झाली आहे. कारखान्यांच्या हितासाठी सर्वतोपरी प्रयत्न केला जाईल. सहकारी संस्था टिकल्या पाहिजेत, असेही ते म्हणाले. साखर कारखान्यांनी कारखान्यातून निघणाऱ्या खराब रसायनयुक्त पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सीवेज ट्रीटमेंट प्लँट उभारावेत व ते पाणी आसपासच्या शेतीसाठी उपलब्ध करुन द्यावे, अशाही सूचना त्यांनी केल्या. साखर कारखाना कामगारांच्या वेतनवाढीच्या अनुषंगाने त्रिपक्षीय समितीला बैठकीबाबत सूचना

**यावर्षी ११ लाख २१ हजार मे. टन ऊस गाळप करुन ११ लाख १७ हजार क्विंटल साखर उत्पादन घेतले असून इथेनॉल तसेच सहवीज निर्मितीही चांगल्या प्रकारे केली आहे. चालू गळीत हंगामात ३ हजार १३२ रुपये दर दिला असून खोडकी आणि दिवाळीतही पुढील बिले देण्यात येतील. कारखान्याच्या सुमारे ३ हजार ५०० शेतकऱ्यांनी एकरी १०० टनाच्या वर उत्पादन घेतले आहे असे त्यांनी सांगितले.**

**: ॲड. केशवराव जगताप (चेअरमन)**

# पशुसंवर्धन विभागाच्या योजनांविषयी सखोल मार्गदर्शन

**शिंगवे पारगाव** : पश्चिम पट्टा असणारा आदिवासी भागात पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी पाटण आणि आरोग्य विभाग पाटण यांच्या वतीने मौजे गाव पाटण येथे जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने महिलासाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले डॉ .पुजा शंकर बोंबले पशुधन विकास अधिकारी पाटण यांनी कुक्कुटपालन ,शेळीपालन,चारा व्यवस्थापन, जनावरांचा संतुलित आहार, निकृष्ट चारा सकस करणे व पशुसंवर्धन विभागाच्या योजना विषयी मार्गदर्शन केले. जागतिक महिला दिनाच्या औचित्य साधून महिलांचे पशुसंवर्धन क्षेत्रातील महिला पशुपालकांना कुक्कुटपालन व पक्षांचे उष्णतेमुळे होणाऱ्या उष्माघातापासून कसे संरक्षण करावे त्यावेळेस श्रळींशअ ींपळल ीिश्रींळींळींराळप कसे देण्यात यावे बद्दल प्रशिक्षण देण्यात आले. तसेच उन्हाळ्यात उन्हाळ्यात भासणाऱ्या हिरव्या चाराची टंचाई ही मका बियाणं वापरून जनावरांच्या खाद्यासाठी मक्याचे शेतात उत्पादन कसे घ्यायचे व त्याचा संतुलित आहारात कसा द्यायचा हे समजून सांगितले.

निकृष्ट चारा सकस करणे या अंतर्गत भात पेंड्यांवर गुळाचे व खनिज मिश्रणाचे द्रावण व शिंपडून ते जास्तीत जास्त पौष्टिक बनवून जनावरांना खायला देणे याबद्दल माहिती देण्यात आली,त्याचे फायदे हे समजून सांगण्यात आले. पशुसंवर्धन विभागाचे पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी येथील डॉ. पुजा बोंबले पशुधन विकास अधिकारी व पशुधन पर्यवेक्षक डॉ. तेजस विठ्ठल मुळक, पशुसखी सौ.सुनीता वडेकर यांच्या टीम सहकार्याने प्रशिक्षण देण्यात आले.सदर कार्यक्रमात निलेश गावडे,रोहिदास भाऊ शिंदे यांनी औषधांबद्दल मार्गदर्शन केले. सदर प्रशिक्षणात आरोग्य विभागाचे डॉ.आकाश गुजर आरोग्य समुदाय अधिकारी, शशिकांत थोरात आरोग्यसेवक व सिस्टर वर्षा मावळे संगीता वाडेकर व सुमित्रा वडेकर यांच्यामार्फत सदर उपस्थित महिलांचे आरोग्य तपासणी करून त्यांना योग्य तो औषधोपचार करण्यात आला व स्तन कॅन्सर व क्षय रोग आणि महिलांचे आरोग्य, उष्माघात पासून होणाऱ्या स्थितीत काळजी कशी घ्यावी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

Printed By, Published By, on behalf of: **Ismail Salim Shaikh,** Printed at Meher Creative Graphics, Chistiya Colony, N-5, Cidco, Tq. & Dist. Aurangabad 431003 (Maharashtra) and published from **Zunjar janta** gulshan nagar, Sillod, Tq. Sillod, Dist. Aurangabad - 431112 (Maharashtra), Editor - **Ismail Salim Shaikh,** Mob:- **8180068180** E-mail: zunjarjanta@gmail.com **RNI NO. MAHMAR/2022/82590**

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक **इस्माईल सलीम शेख** यांनी मेहेर क्रिएटिव्ह ग्राफिक्स चिश्तिया कॉलोनी -५ सिडको औरंगाबाद - ४३१००१ (महाराष्ट्र) येथे छापून, **झुंजार जनता,** कार्यालय गुलशन नगर सिल्लोड ता. सिल्लोड जिल्हा औरंगाबाद -४३१११२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - **इस्माईल सलीम शेख** संपर्क ८१८००६८१८० E-mail: zunjarjanta@gmail.com **RNI NO. MAHMAR/2022/82590**